# पत्रसंग्रह

## पत्र १ : श्री सदाशिवराव फडके

**॥श्री ज्ञानेश्वरमाउली ॥**

कृपासागर श्रीसदाशिवराव फडके यांस कृ. सा. न. वि. वि.

आपले ता. ७-६-५५ चे पत्र पावले. उन्हाळ्याचे दिवस म्हणजे लग्नमौंजीचे दिवस. त्यामुळे एके ठिकाणी राहणे होत नाही व या दिवसातच बहुधा मी आळंदीला जात असतो; म्हणून आपली पत्रे पोहोचायला व त्यांना उत्तरे देण्याला वेळ झाला. क्षमा असावी. पत्राचे उत्तर देण्याला कंटाळलो असा अर्थ नाही. आग्रहाला मी कंटाळतो; पण प्रामाणिक शंकाना मी उत्तर देण्याला कंटाळत नाही. आपल्या पत्रातून तशाच प्रामाणिक शंका मांडण्यात येत असल्यामुळे, मी कंटाळलो, अशी शंका घेण्याचे कारण नाही.

(१) श्रीहरीचे निरुपाधिक साकार स्वरूप गुरुगम्य असले तरी, बुद्धिगम्य आहे. प्रेमाची जोपासना कशी करावी हे गुरुवाचून कळत नाही, म्हणून ते गुरुगम्य होय व प्रेम हे बुद्धीतच असते म्हणून बुद्धिगम्यही आहे. बुद्धीत प्रेम व जाणीव असे दोन भाग असतात. जाणीव म्हणजे ज्ञान. ज्ञानाने जे अव्यक्त असते तेच प्रेमाने व्यक्त होते. रामकृष्णांची मानवदेहाप्रमाणे रूपे असली तरी त्यांचे मानवी देह म्हणजे पांचभौतिक किंवा त्रिगुणात्मक नाहीत, हे मी श्रुतिसंतवचनाने दाखविले आहे.

अज्ञानामुळे पांचभौतिकदेह प्राप्त होतो. अज्ञान नाहीसे झाल्यावर मग पांचभौतिक देह घेताच येत नाही. जीवाला अज्ञान आहे त्यामुळे त्याला पांचभौतिक देह प्राप्त होतो. जीव काही अवतार घेत नाही. परमेश्वर अवतार घेतो. परमेश्वराला अज्ञान कोणी वेदान्ती मानीत नाहीत व त्याला अज्ञान नाही. मी अज्ञानी आहे असे तो म्हणतही नाही. तेव्हा त्याला पांचभौतिक देह प्राप्त होणे किंवा घेता येणे शक्य नाही. परमेश्वर अवतार घेतो हे तर गीता, पुराणे यात स्पष्ट सांगितले आहे.

ज्याअर्थी अज्ञान हीच उपाधी आहे व ते ईश्वराच्या ठिकाणी नाही. त्याअर्थी



त्याला देह धरायचा तो उपाधिरहितच घेणे शक्य आहे.

ज्याप्रमाणे आपण समुद्राचे कांठावरून हजारो मैलाचा समुद्र, आपल्या दृष्टीत येईल येवढाच पाहात असलो तरी तो हजारो मैल पसरला आहे, हे जाणत असतो, विसरत नाही. आणि दृष्टीत येणाऱ्या समुद्राचा व हजारो मैल पसरलेल्या समुद्राचा संबंधही तुटत नाही, त्याप्रमाणे व्यापक असलेला परमात्मा आपल्या प्रेमाकरिता सगुण साकार झाला तरी त्याची व्यापकता नाहीशी होत नाही. किंवा तिचा संबंधही तुटत नाही.

श्रीहरीचे रामकृष्णादी स्वरूप असेच परिच्छिन्न भासत असले तरी ते अपरिच्छिन्नच आहे. मानवी देहाप्रमाणे औपाधिक वाटत असले तरी निरुपाधिकच आहे. सगुण असले तरी निर्गुणच आहे. म्हणजे तेथे मायागुण नाहीत व गुणगुणी भावही नाहीत. साकार असले तरी निराकारच आहे.

जितकी दिसते त्या मर्यादेच्या पलीकडे वस्तु नाही असे ज्या वस्तुविषयी आपल्याला वाटते ती वस्तु परिच्छिन्न म्हटली जाते. अज्ञानी पुरुषाला रामकृष्णांच्या देहाविषयी अशीच परिच्छिन्नत्वाची कल्पना होत असली तरी तो त्याच्या अज्ञानाचा प्रकार होय. ज्ञानीपुरुषाला मात्र तो अपरिच्छिन्नच वाटतो. म्हणून ज्ञानावांचून रामकृष्णादिकांच्या स्वरूपाचा यथार्थबोध होत नाही. अपरिच्छिन्नता केव्हाही ज्ञानानेच घेतली पाहिजे. डोळ्यांनी परिच्छिन्नता घेता येते. व्यापकवस्तू डोळ्यांनी ग्रहण करावयाची तर अंशतःच पाहावी लागणार नाही काय ? वर समुद्राचा दृष्टांत मी दिला आहे. ज्ञानाने व्याापक जाणून वृत्तीने अंशभूत ग्रहण केल्याने त्याच्या निरुपाधिकत्वात फरक पडेल काय? व्यापकता विसरून अंशतः ग्रहण करणे व अंशभूतच वस्तु आहे असे समजणे, हे अज्ञान उपाधिजन्य म्हणता येईल. पण व्यापक अशा निरुपाधिक वस्तूचा व्यापकतेचे ज्ञान राहून अंश ग्रहण करणे निरुपाधिकच असते.

**एकदेशीय व्यापका सरिसा पाडू ।** - या ओवीत हेच तत्व सांगितले आहे.

(२) सच्चिदानंद हे आकाररहित नाहीत. त्यांना आकार आहे. सच्चिदानंदाचे ज्ञान होते ते विशेषणरूपाने होते.

**सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्मेति लक्षणार्थवाक्यम् ।**

**सत्यादीनि हि त्रिणि विशेषणार्थानि पदानि विशेषस्य ब्रह्मणः ।**

**विशेष्यं ब्रह्म विवक्षितत्वाद्वेद्यतया ।**
**सत्यादिभिस्त्रिभिर्विशेषणैर्विशेष्यमात्रं ब्रह्म विशेष्यान्तरेभ्यो निर्धार्यते ॥**

गुण-गुणीभावाने किंवा विशेषण-विशेष्यभावाने ब्रह्म जाणले असता ते सगुण होईल की निर्गुण, साकार की निराकार, याचा विचार केला पाहिजे. पण हे सगुणत्व किंवा निर्गुणत्व अविद्यात्मक विपरीत उपाधीचे कार्य नसून विद्यात्मक उपाधीचे कार्य आहे. उपाधी म्हणून ज्याला आपण तुच्छ लेखतो, ती अविद्याउपाधी होय. विद्योपाधी वस्तूचा खरा बोध करून देते; म्हणून तिला उपाधी म्हणून कोणी तुच्छ लेखत नाही. अमृतानुभवात विद्योपाधीचा निषेध केला आहे, तो अविद्या उपाधीच्याअपेक्षेने. जो विद्योपाधीचा आपेक्षिक संबंध ज्ञानानंतर असतो त्याचा निषेध केला आहे. तो संबंध सुटला की, विद्या हीच परमेश्वराची मूळ शक्ती सिद्ध होते. ही निरुपाधिकच आहे. ब्रह्माचे सच्चिदानंद गुणगुणीभावाने नटणे हा**ब्रह्मविद्या साकार,** वृत्तिरूप आत्मसाक्षात्कार, सगुण रामकृष्णादी हे सर्व साकार त्या विद्येनेच भासतात; म्हणून ते निरुपाधिकच आहेत. फरक इतकाच की ब्रह्मविद्यासाकाराचे ठिकाणी अवयव नाहीत व रामकृष्णादिकांचे ठिकाणी अवयव आहेत. त्याचे कारण ब्रह्मविद्या साकार व वृत्तिरूप आत्मसाक्षात्कार ज्ञानाचा विषय होतात आणि रामकृष्णादीरूपे प्रेमाचा विषय आहेत. प्रेमात आलिंगनादी प्रेमवृत्तीमुळे ब्रह्माला अवयव धारण करावे लागतात. म्हणून रामकृष्णादी अवयवधारी साकार आहेत.

(३) विश्वरूपाला आपण त्रिगुणात्मक म्हणता, हे केवढे आश्चर्य, श्रीज्ञानेश्वर महाराजांनी अर्जुनाने विश्वरूप कसे पाहिले याचे वर्णन करताना –
**प्रथम स्वरूपसमाधान । पावोनि ठेला अर्जुन ।**
**सवेचि उघडले लोचन । तंव विश्वरूप देखे ॥**
आत्मज्ञानानंतर डोळे उघडून पाहिले तो विश्वरूप दिसायला लागले,
**तैसी गिळिली विश्वरूपें । प्रपंचरचना ॥**
**जें अतींद्रिय म्हणूनि व्यवस्थिलें । केवळ ज्ञानदृष्टीचिया भागा फिटलें ॥**
इत्यादी ज्या विश्वरूपाचे वर्णन आहे ते काय त्रिगुणात्मक म्हणायचे? त्रिगुणात्मकच असते तर दिव्यदृष्टि देण्याचे कारण काय? आपण जसे जगत् पाहतो तसेच अर्जुनाचे विश्वरूपदर्शन होते काय? हे व्यापक विश्वरूप श्रीहरीचे भक्त्यालंबनरूप



नव्हे. भक्तीचा विषय होणारे रूप एकदेशीय असून हे व्यापकरूपही श्रीहरीचेच, पण (ते) ज्ञानयोगाने ज्ञेय आहे. ज्ञानाशिवाय विश्वरूप कळत नाही व ज्ञानावाचून सगुण एकदेशीय श्रीहरीचे माहात्म्य कळत नाही. पण तेवढ्याने साधनभक्तीत त्याचा साक्षात्कार होऊ शकत नाही असे नाही.

*हरिपाठाची अट*

(४) हरिपाठाशिवाय काही नाही. आपण वर्णिलेली सामुग्री हरिपाठाने मिळते. आरंभी काहीही सामुग्री लागत नाही. हरिपाठानेच सर्व सामुग्री परमात्मा जुळवून देतो, हे मी सांगितलेच आहे.

आपण आपल्या शंका काढण्याच्या पूर्वी मी दिलेल्या प्रमाणांचा व केलेल्या विवरणांचा चांगला विचार करा, असे मी आपल्याला नम्रपणे सुचवितो. हरिनामस्मरण हे उपलक्षण आहे. म्हणजे त्यावरून आपआपल्या इष्टदेवतेचे स्मरण असा अर्थ घ्यावा, असा अर्थ. विष्णूचे नामस्मरणाबरोबर शिवाचे नामस्मरण करावे. भेद पाहू नये. वारकरी वैष्णवसंप्रदायात दोन्ही एकरूपच समजले जातात. शिव व विष्णु यांचे नाम म्हणजे त्यांचे अवतारही येतात. दत्तात्रय नामस्मरण याचा विरोध नाही. त्याचा हरिपाठात उल्लेख करण्याचे कारण नाही. हे नाममाहात्म्य त्या त्या देवतांच्या पुराणातून सांगितलेच आहे. इष्ट सोडावे, असे कोणी म्हणत नाही. पण इष्टच आधी समजणे कठीण आहे. जो कोणी उपासना करतो तो इष्ट देवतेचीच करतो असे नाही. कारण, पूर्वजन्मात केलेल्या उपासनेमुळे या जन्मात ज्या देवतेच्या कथा ऐकून आपले मन द्रवते ती इष्टदेवता म्हटली जाते. असे प्रत्येक उपासकाचे होते, असे नाही. हे इष्टदैवत पाहून जो चालतो त्याला उपास्य लवकर प्रसन्न होते. नाहीतर प्रत्येक जन्मात नवीन नवीन इष्टदेवता मानल्यास प्रगती आरंभरूपच राहते. विष्णूवाचून अन्य देवतांचे नामस्मरण वर्ज्य आहे. त्या देवता सूर्य, इंद्र, चंद्र, सोम इत्यादी आहेत. किंवा विष्णु व शिव हे दोघे शुद्धसत्त्वाचे दोन भेद असल्यामुळे या दोघांच्या नामाबरोबर व त्यांच्या अवतारांच्या नामाबरोबर दुसऱ्या राजस देवतांच्या नामांची तुलना करता येत नाही.

शुद्धसत्त्व म्हणजे त्रिगुणातीतच आहे. त्रिगुणातील सत्त्व मलीनसत्त्व होय. त्रिगुणातील नामगुणाचे महत्व संसारापुरतेच आहे. परमार्थात तमोगुणाला महत्व

नाही; पण शिवमूर्ती उपासकांकरिता सत्त्वगुणीय आहे व सृष्टीकरता तमोगुणी आहे. म्हणून प्रश्नच उद्भवत नाही. हरिनामस्मरणावाचून इतर साधने विघ्नकृष्ट आहेत म्हणजे दूरची आहेत. हरिनाम अत्यंत जवळचे संनिकृष्ट कारण आहे. विघ्नकृष्ट साधने संनिकृष्ट साधनांचे प्रेम देतात.

(५) शिवपुराणांतून विष्णूची निंदा व विष्णुपुराणातून शिवाची निंदा असली तरी दोघेही कारणब्रह्म असून दोघेही समान सेव्य आहेत, असा निर्णय संतांनी केला आहे. महापुराणातून शिव विष्णू सोडून बाकीच्यांच्या नामांचे महत्व आले नाही. उपपुराणातून दिले असले तरी उपपुराणे महापुराणांप्रमाणे लावावी, असा नियम आहे. म्हणून शिवविष्णूंच्या नामासमान इतर देवतांचे नामे मानू नयेत, असा पद्मपुराणात उल्लेख आहे. पुराणेही सात्त्विक, राजस, तामस आहेत. पद्मपुराण सात्त्विक आहे. सात्त्विकपुराण निर्विकार असल्यामुळे त्यातील वचन निर्विकार म्हणून विशेष प्रमाण असते. भारत सर्व पुराणांचा सार आहे. त्यात शिव व विष्णू म्हणजे एकच शुद्धसत्त्व दोन ठिकाणी विभागले असे सांगितले आहे. **एकं सत्त्वं द्विधा कृतम् ॥**

(६) आपण शिवाची उपासना करू इच्छिता तेव्हा विष्णू, विष्णूचे नाम यांचा विरोध न करता शिवाचे नामस्मरण जेवढे होईल तेवढे करावे. शिव वेदान्तदृष्टीने पूर्णब्रह्म आहे, म्हणून सगुण साकार शिवमूर्तीला पांचभौतिक समजू नका. वेदान्तमते शिवाचे सगुणस्वरूप पांचभौतिक नाही व पांचभौतिक समजल्याने प्रेम कधी वाटणार नाही. पांचभौतिक समजून केलेले प्रेम संसारातील प्रेमाप्रमाणे होईल व परमार्थलाभ काही होणार नाही. परमेश्वराला सगुणसाकार पूर्णपरब्रह्म समजून त्याची उपासना करावी. हा व्यवहार्य मार्गच साधुसंतांनी सांगितला असताना, व्यवहार्याला कठीण व व्यापक परमेश्वरबुद्धि ठेवणे अव्यवहार्य, त्याला आपण सुलभ समजू लागलो आहे.

(७) हरिनामस्मरण लक्ष ठेवूनही होते व वाणीला संवय पाडल्यास लक्ष न ठेवताही होऊ शकते. म्हणून व्यग्र चित्ताला तो उपायच सोपा आहे तसे यांत्रिक नामस्मरण झाले तरी यांत्रिक क्रियेपेक्षा त्या यांत्रिक नामस्मरणाचा दर्जा फार मोठा आहे.

ज्या पापरूप प्रारब्धामुळे मन एकाग्र होत नाही ते प्रारब्ध, भगवंताच्या संकल्पानेच बनले असल्यामुळे त्या प्रारब्धाचा तुम्हाला प्रतिबंध होणार नाही, असे ते वळविण्याची शक्ती भगवंतामध्ये आहे. प्रारब्धप्रतिबंधामुळे नामस्मरणाला अडथळा होतो म्हणून खरोखरच मनात अत्यंत वाईट वाटू द्या व त्या कळवळ्याने भगवंताचा धावा करा. भगवान् खात्रीने अडथळा दूर करील.

संसारातील प्रारब्धजन्य अडथळे संसारसुखाकरिता दूर करण्याची सत्ता भगवंताने कर्माकडे दिली. म्हणजे संसारात जसे कर्माप्रमाणे होणार असेल तसे तो होऊ देतो. पण भगवंताकडे मन लावित असता जर अडथळे आलेत तर ते दूर करून मार्ग मोकळा करण्याची सत्ता भगवंताने आपल्याकडे ठेविली आहे. आपण आपली तशी इच्छा मात्र दर्शविली पाहिजे म्हणजे तो साध्य करतोच.

(८) परमशिवतत्त्व हे केव्हाही परमतत्त्वच आहे. ते नामरूपरहित असून नामरूपसहितही तेच आहे. नामरूपरहित तत्त्व परम होय व नामरूपसहित तत्त्व कनिष्ठ होय अशा समजूतीलाच अज्ञान म्हणतात. अज्ञानामुळेच ही समजूत होते.

लेखन, वाचन, प्रवचनादी प्रकार नामस्मरणाला विरोधी आहेत असे नव्हे. हे सर्व प्रकार ज्या भगवंताचे आपण नामस्मरण करतो ते सगुण भगवद्रूप मायारहित परमेश्वररूप व आपल्याशी एकरूप कसे आहे, याची चिकित्सा करण्याकरिता व त्यायोगे त्या भगवंताच्या सगुण स्वरूपाचे ठिकाणी उत्तरोत्तर आत्मप्रेमवत् निःसीमप्रेम उत्पन्न होण्यालाच उपयोगी पडतात. पण सगुण साकार परमेश्वराहून नामरूपरहित शिवतत्व निराळे आहे, असे समजून जर लेखन-वाचन-प्रवचन झाले तर शतजन्मही प्रयत्न करून काही लाभ होणार नाही, हे मी निक्षून सांगतो.

### *जीव आणि परमात्मा*

(९) सच्चिदानंद या परमात्मलक्षणात ध्यानाची व प्रेमाची परिच्छिन्नता नाही; पण परिच्छिन्नतेसारखा विषय आहे, हे जरा विचार केल्यास दिसून येईल. सच्चिदानंद हा परमात्मा प्रत्येकाच्या हृदयात प्रगट आहे. आपल्या ठिकाणी 'मी' म्हणून जे वृत्तिस्फुरण होते ते परमात्मस्फुरणच असून स्फुरणामुळेच मर्यादित आहे. या स्फुरणात ज्ञान व आनंद किंवा प्रेम आहे. 'मी' म्हणून स्फुरणारी वृत्तिच जाणते व तिच्याच ठिकाणी प्रेम आहे. म्हणून मी भोक्ता होतो. पण हे वृत्तीचे ज्ञातृत्व भोक्तृत्व ज्ञेय व भोग्य विषयाला धरून आहे व 'मी'पण देहाला धरून आहे. म्हणून

ही अज्ञानस्थिती म्हटली जाते व 'मी' म्हणणारा जीव घेतला जातो. पण देहावरील मीपण निघून ते आत्म्याचे ठिकाणी बसले की तेच 'मी' स्फुरण परमात्मा होते.

**अर्जुनपण न घेता । मी ऐसे जे पंडुसूता ।**
**उठे ते तत्वता । तयाचे रूप ॥**

'मी' हे स्फुरण परमात्मा आहे. पण देहाचा अहंकार धरून ते मीपण भासते तोपर्यंत त्यालाच जीव म्हणतात.

हे देहाचे मीपण ज्ञानाने सुटल्यावर, देहापासून मोकळे झालेले मीपण ज्या सत्तेवर स्फुरते त्या आपल्या सत्तेलाच विषय करते व त्याच्याशी ऐक्य करते तेव्हा **'मी' ब्रह्म असा अनुभव** येतो. - या मीपणातच जी प्रेमवृत्ती असते ती देहावरून मीपण सुटल्याबरोबर नाशिवंत विषयाचे प्रेम व भोक्तृत्व सोडून जेव्हा अखंड सुखाकरिता तळमळते (तळमळणे हेच प्रेम होय) तेव्हा ती **अखंड सुखस्वरूप** परमात्म्याला विषय करते. ज्याप्रमाणे लहरीला आधार असलेल्या पाण्याचा पृष्ठभाग लहरीमुळे पृथक् पडतो. तसा सुखसागर परमात्माही **प्रेमवृत्तीला विषय झाल्यामुळे पृथगिव** पडतो. हाच **परमात्म्याचा साकारपणा** असून येथेच प्रेमाचे सुख भोगण्याकरिता निरनिराळ्या प्रेमवृत्तीमुळे अवयवांचा साक्षात्कार होतो. निर्विकल्प परब्रह्माचे ठिकाणी विद्यावृत्तीमुळे त्या अंशद्वारे परमेश्वरही **विद्यासाकार, ज्ञानसाकार, आनंदसाकार** असा अनुभविला जातो. हा सर्व संतांनी आपला अनुभव सांगितला आहे. अनुभव येईपर्यंत तशी परोक्षबुद्धी ठेविली पाहिजे व नामस्मरण केले पाहिजे. सच्चिदानंदात परिच्छिन्न विषय आहेत.

*प्रेम कल्लोळ*

(१०) घटाकाश व महाकाश यांच्या ज्ञानाने होणारा अद्वैत संबंधच आपण लक्षात घेतो; पण **जीवब्रह्मैक्यांत ज्ञानाने होणाऱ्या संबंधाबरोबर प्रेमाने होणारा ऐक्य सबंधही आहे,** याचा विचार आपण करीत नाही. **ज्ञानाने होणाऱ्या ऐक्यात ऐक्य होणाऱ्या वस्तूचा विसर पडत नाही व प्रेमाने होणाऱ्या ऐक्यात ऐक्याचाही विसर पडतो**. म्हणून ज्ञानाने ऐक्य कृत्रिम होते व प्रेमाने ऐक्य स्वाभाविक होते. **प्रेमकल्लोळ द्वैतमूलक नाही स्वाभाविक आहे.**

*ज्ञानाने होणारे अद्वैत*

द्वैत न भासणे किंवा द्वैताचा विसर याला ज्ञानाने होणारे अद्वैत म्हणत नाहीत. कारण तसे अद्वैत ज्ञानाने होत नाही. ज्ञानाने द्वैत खोटे वाटते. द्वैताचा भास राहतो. प्रेमाने द्वैत जाणले जात नाही. अखंड सुखाची इच्छा हा प्रेमझरा आपल्या ठिकाणी आहेच. प्रेमसागर सगुण परमेश्वर आहे. त्याचे ठिकाणी प्रेमझरा वाहू दिला म्हणजे झाले.

(११) जीवब्रह्मसंबंधातील अनन्यगतिकत्व, सामरस्य, इत्यादि भाव बुद्धिगम्य आहेतच; पण एकदा का देहावरील मीपण नाहीसे होऊन पुनः त्याचा उदय झाला नाही की हे बुद्धिगम्य भाव आपला अकृत्रिम स्वभाव ठरतो.

(१२) यशोदा-कृष्ण, राधा-कृष्ण यांचे प्रेम राजस म्हणता आश्चर्य आहे!

चंचलता हा रजोगुणाचा धर्म आहे व राग म्हणजे विषयप्रेम रजोगुणाचा धर्म आहे. म्हणजे एकाच विषयाचे ठिकाणी सुख न भोगता नाना विषयभोगाची इच्छा हा रजोगुण आहे. पण यशोदा किंवा राधा यांच्या ठिकाणी कृष्णापासून सुख मिळावे अशी इच्छा नव्हती. उलट आपण भगवंताला सुख द्यावे अशी इच्छा होती व श्रीकृष्णावाचून दुसरीकडे त्यांचे चित्त धावत नसे, यशोदा, राधा इत्यादिकांचे प्रेम वर्णन करणाऱ्या शुकाचार्यांना त्यांचे प्रेम शुद्ध दिसावे व आपल्याला त्यात राजसगुणाचा वास यावा हे नवल नाही काय ? मोबदल्याची इच्छा करून जे प्रेम केले जाते ते प्रेम राजस असते, म्हणून ते अध्यस्त आहे. पण **मोबदल्याची इच्छा नसून निरपेक्ष प्रेम हेच अत्मप्रेम आहे.** ते निरुपाधिक म्हणून सांगितले आहे.

(१३) आत्मा साकार नाही तर परमात्मा कसा साकार राहू शकेल ?

याचे उत्तर वर दिले आहे. आत्मा आपल्या ठिकाणी स्फुरद्रूपच आहे, म्हूऩ साकारच आहे.

**जे एकचि नव्हे एकसरे । दोघां दोनपण नाही पुरे ।**
**काय नेणो साकारे स्वऊपे जिये ॥४॥ अमृ.प्रक.१**

ब्रह्म सदासर्वदा एकरूप राहत नाही.ते स्वशक्तीने स्फुरते व दोनपणाला येते; पण त्याचे दोनपण पुरे नाही, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज अमृतानुभवात म्हणतात. साकार झाले तरी निराकारत्व सोडत नाहीत आणि निराकार असूनच साकार होतात असा अर्थ.

(१४) नामरूपे भगवंताहून निराळी आहे व निराळी वस्तु समजून आपण जेव्हा त्या नामरूपांचा भगवंताशी संबंध लावतो तसा संबंध नामरूपांचा व

माझा नाही, असे भगवंताचे म्हणणे आहे. सर्वच वस्तूंशी तसा संबंध आपण लावीत असतो. तसाच भगवंताशीही नामरूपांचा संबंध- भगवंताहून निराळे कल्पून - आपण लावीत असतो. एका भगवंतावाचून जर दुसरी वस्तूच नाही तर नामरूपे भगवंताहून निराळी कोठून आलीत? नामरूपे भगवंताहून निराळी नसतील तर त्याचा भगवंताशी संबंध लावून 'अमुक नामरूपांचा भगवान् किंवा अमु आकाराचा भगवान्' असे बोलणे शोभते काय? एकाच वस्तूचा त्याच वस्तूशी संबंध कसा मानता येईल?भगवानच नामरूपस्वरूप असताना, ते विसरून भगवंताची नामरूपे आपण म्हणतो; हे अज्ञान आहे;कारण असे म्हणताना 'भगवान व नामरूप अशा दोन वस्तूंची आपण कल्पना करीत नाही काय? 'मी नामरूपरहित आहे' असे सांगून या द्वैकल्पनेचे भगवंतानी निराकरण केले आहे. भगवान व नामरूपे, गूळ आणि त्याची गोडी - याप्रमाणे एकच आहे असे आपण समजतो की गोडी व गूळ यांचे तादात्म्य मानतो? गोडी व गूळ यांचे प्रमाणे नामरूपादि सर्वांचे भगवंताशी तादात्म्य मानिले पाहिजे असा 'मी नामरूपरहित आहे' या भगवद्वचनाचा अर्थ आहे.नाहीतर नामरूपे भगवंताहून निराळी मानल्यास द्वैतसिद्धान्त आपण प्रस्थापित कराल की अद्वैत सिद्धान्त? अद्वैतसिद्धान्त मान्य असल्यास भगवंताशी नामरूपांचे ऐक्य तादात्म्य केल्याशिवायगत्यंतर नाही.पान २१४

(१५) निर्गुण या शब्दाचा अर्थ काय घेता हे समजत नाही.

निर्गुण म्हणजे सत्त्व, रज, तम या मायागुण विरहित असा आचार्यांनी अर्थ केला आहे. या गुणाच्या स्वाधीन म्हणजे गुणाने बांधले जाते त्याला सगुण म्हणतात. सगुण रामकृष्ण परमात्मा हा गुणाच्या स्वाधीन असतो, असे वेदान्तात कोठेच आचार्य म्हणत नाहीत व भगवानही कोठे तसे म्हणत नाही तेव्हा श्रीकृष्ण भगवान् निर्गुण नाहीत काय?

वर मी सच्चिदानंद हेही ब्रह्माचे धर्म आहेत, असे सांगितले आहे. या धर्माच्या व याच धर्मामुळे भासणाऱ्या ज्ञान-वैराग्य-ऐश्वर्यादी निरतिशय षड्गुणांमुळे परमात्मा साकार व सगुण भासतो असे मी प्रतिपादिले आहे.

नैय्यादिकादी शास्त्रकार द्रव्य व गुण हे दोन निराळे पदार्थ मानून समवाय संबंधाने द्रव्याला सगुण मानतात. तसा गुणगुणीभाव ब्रह्माचे ठिकाणी सच्चिदानंद धर्माचा व ब्रह्माचा नाही. सच्चिदानंद व ब्रह्म यांचे ऐक्यच आहे. त्याचप्रमाणे भगवंताचे ठिकाणी भासणाऱ्या षड्गुणैश्वर्यादिकांचाही भगवंताशी गुणगुणी भावाने संबंध नाही. म्हणून मायागुणरहित निर्गुण आहे व सच्चिदानंदादी धर्मसहित सगुण आहे, असे आम्ही म्हणतो.

(१६) लक्षण हे स्वरूपभूत असते. साखर गोड असते. हे लक्षण रोचक म्हणता येईल की अनुभवात्मक म्हणता येईल? परमप्रेमास्पद आत्मा आहे हे पंचदशीत व भाष्यात प्रतिपादिले असताना ते रोचक कसे म्हणावयाचे? परमप्रेमरूप आत्मा व प्रेमरूपच त्याचे वृत्तिरूपस्फुरण. या परमप्रेमवृत्तिस्फुरणालाच भक्ती म्हणतात. वस्तुस्थितीला रोचक म्हणायचे तर सच्चिदानंद ब्रह्म आहे अशा सर्व सिद्धान्तालाच रोचक म्हणावे लागेल व विषयसेवन म्हणावे लागेल.

(१७) नाम व विचार यात महदंतर आहे. भगवत्साक्षात्कारात विचार मावळतो; पण नाम सुटत नाही. अर्थग्रहण झाल्यावर विचार सुटलाच पाहिजे. नाहीतर अर्थाकार चित्तच होणार नाही. नामाचे तसे नाही. नामरूप भगवंताचे ठिकाणी अनुभवले जातात.

(१८) शब्दाने ब्रह्मनिष्णात होत नाही. शब्दाने ब्रह्माची मीमांसा होऊन ब्रह्माचा स्वरूपनिश्चय होतो. ब्रह्मनिष्णात व्हायला ब्रह्मसाक्षात्काराची प्रक्रिया होऊन अभ्यास करावा लागतो. त्या अभ्यासाने परमात्म्याहून जेवढे कांही आज निराळे भासते तेवढे सर्व विसरून ब्रह्मस्थितच बुद्धि झाली पाहिजे. तेव्हा ब्रह्मनिष्णात म्हटले जाते. भक्तीशिवाय ही ब्रह्मनिष्णातता साधत नाही, म्हणून बोलक्या वेदान्ताची निंदा करावी लागते.

(१९) प्रत्येक शास्त्रग्रंथाची व अन्य साधनांची सांगितलेली फलश्रुती आत्यंतिक साध्याच्या दृष्टीने म्हणजे अत्यंत दुःखनिवृत्ती व अखंड परमानंदप्राप्ती या साध्याच्या दृष्टीने खोटी आहे यांत शंकाच नाही. ते साधन एका भक्तीवाचून स्वतंत्रपणे कोणत्याही साधनाने प्राप्त होत नाही.

(२०) ब्रह्मविचार करू नये असे माझे म्हणणे नाही. ब्रह्मविचार सगुणाची किंमत समजण्याकरिता उपयोगीच आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज व श्रीएकनाथमहाराज यांनी जे ग्रंथ लिहिले ते ब्रह्मवस्तूची मीमांसा करून ब्रह्माची भक्ती करावी अशा उपदेशानेच भरलेले आहेत. त्यांनी योगाभ्यास केला तो भक्तियोगमूलकच होता.

ज्ञानेश्वरी, भागवत, भावार्थरामायण यात नुसता बोलका वेदान्तच आहे काय?

(२१) सगुणाने निर्गुणाचा अव्हेर केला जातो तो सगुण सोडून निर्गुण घेतले जाते तेव्हा. भक्तीने ज्ञान व विचार याची निंदा केली जाते ती सगुणाची भक्ती तुच्छ लेखिली जाते तेव्हा. अपरोक्षानुभूतीच्या भरवंशाने जेव्हा अपरोक्षानुभवी पुरुष सगुणभक्ती करीत नाही तेव्हा ध्येय प्राप्तीच्या (अत्यंत दुःखनिवृत्ती व परमानंद प्राप्ती) दृष्टीने त्याची निंदा केली जाते. म्हणजे भक्तिरहित साधन केले असता काही अंशाने अपूर्णता राहून जाते, म्हणून त्याची निंदा करणे योग्य नाही काय? आपल्याला पटत नाही यावर काही सत्य अवलंबून नाही. जे सत्य असेल तेच पटवून घेतले पाहिजे. ज्याने आत्यंतिक ध्येय प्राप्त करून घेतले त्यांच्या मताला जे प्रामाण्य आहे तसे प्रामाण्य आमच्या तुमच्या मताला 'पटत नाही' म्हटल्याने येणार नाही.

आपल्या पत्राची यथाशक्ती उत्तरे दिली आहेत. मी एक आपल्यासारखाच अभ्यासू आहे. त्यातही मी इकडील असभ्य भाषा बोलणारा आहे. पत्रात जितके सभ्यतेचे माप सांभाळता येईल तितके सांभाळण्याला जपलो आहे. तरी कोठे काही सवंयीमुळे असभ्य शब्द निघून जाण्याचा संभव आहे. म्हणून तसे आढळल्यास क्षमा मागतो. श्रीशिवगुरू सर्व बरे करतील याची खात्री असू द्यावी.

*आपला, नारायण पंडित.*

## पत्र २ : श्री सदाशिवराव फडके

**।।श्रीज्ञानेश्वरमाउली।।**

श्री. स. कृ. फडके यांस कृ. सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. मजकूर वाचून आनंद वाटला. आपल्या शंकाची उत्तरे यथामति खाली देत आहे.

ब्रह्माच्या अद्वैतसत्तेला मी सगुण श्रीहरि म्हटले नाही. अद्वैतसत्ता श्रीहरीचे निर्गुण रूप होय. जसा अलंकार सुवर्णव्याप्य तसा श्रीहरी निर्गुणव्याप्य आहे. सोन्याचा अलंकार होय हे कळण्याने जशी अलंकाराची गोडी वाढते तसे सगुण श्रीहरीचे साकार रूपही निर्गुणासह निर्गुणावर भासते असे कळण्याने सगुणाची गोडी निःस्सीम होते, असे संतांचे म्हणणे आहे. ब्रह्म सच्चिदानंद स्वरूप आहे. ते प्रत्येकाचे ठिकाणी मीपणाने स्फुरते. त्या स्फुरणात ज्ञान व प्रेम असते. या स्फुरणाला सद्रूप ब्रह्म आधार होते व त्यात सच्चिदानंद हे सामान्य रूपाने असतात. भक्त जेव्हा विषयाचे प्रेम सोडून सद्रूप ब्रह्मात सामान्यपणे असलेल्या आनंदांशाच्या प्राप्तीकरिता तळमळतो व तिकडेच प्रेमवृत्ति लावतो तेव्हा त्याच्या प्रेमवृत्तीमुळे, त्या प्रेमवृत्तीला आधार असणारा आनदांशही साकार भासतो. या साकार आनंदांशाला सगुण श्रीहरी म्हणतात, असे मी

**सत्पद ते ब्रह्म । चित् पद ती माया ।**
**आनंद पदी जया । म्हणती हरि ।।**

ही नाथाची अभंग ओळ देऊन म्हटले आहे. परमात्म्याची शक्ति नामरूपाने स्फुरण पावते व ती नामरूपे सद्रूपाचे ठिकाणीच भासतात. म्हणजे आनंदांशाचे ठिकाणी रामकृष्णादी नामरूपे भासतात; म्हणून आनंदांशाचे ठिकाणी परमेश्वराला सगुण साकार जाणून त्याचे नामस्मरण करणे अशक्य नाही.

(२) ईश्वर व ज्ञानी या दोघांच्याही ठिकाणी अज्ञान नसते म्हणून त्यांची व्यवहारिक सत्ता मानता येत नाही. व्यवहारिक सत्ता ही अज्ञान कल्पित आहे. जग व जगाच्या संबंधी त्याचे जे व्यवहार असतील ते अज्ञानी पुरुषाला व्यवहारिक सत्तेचे दिसतील. त्यांना त्यांचे ज्ञानही नसते. पण प्रेम हे पारमार्थिक असते. तिला व्यवहारिक म्हणता येत नाही; कारण ती लीला ज्ञानानेच दिसण्याजोगी आहे म्हणून त्रिगुणात्मक मायेचा संबंध नाही. मायेचा परमेश्वराने अंगीकार करणे होय असे म्हटल्यास परमेश्वराला जीवदशा मानणे होय. मायेच्या भासाला ईश्वराची सत्ता आधार होणे म्हणजे वेदान्तात ईश्वराने मायेचा अधिष्ठाता होणे म्हणतात. जसा सूर्याला अंधकार गोचर होणे कधीच शक्य नाही, तशी माया परमेश्वर नित्यज्ञानस्वरूप असल्यामुळे परमेश्वराला कधीच गोचर होत नाही. असे सर्व संत म्हणतात. **''नित्याविद्यानिवृत्तत्वात्''** ईश्वराचे ठिकाणी त्रिगुणात्मक माया कधीच नाही असे आचार्य स्पष्टच म्हणतात. ज्ञानानंतर नामरूपांचा व नामरूपात्मक व्यवहाराचा बाध म्हणजे नामरूपे न दिसणे असा वेदान्तात अर्थ नाही हे मी पंचदशीकाराचे वचन घेऊन दाखविले आहे. अज्ञानकाळी नामरूपाचे वस्तुत्व व अस्तित्व भासत होते ते ज्ञान झाल्यावर नामरूपे ही स्वतंत्र वस्तु नव्हे व त्याला स्वतंत्र अस्तित्वही नाही. नामरूप ही ब्रह्मवस्तुच व त्याला ब्रह्माचेच अस्तित्व आहे

असा अनुभव येतो. म्हणजे नामरूपाचे ब्रह्माशीच ऐक्य करावे लागते. शंकराचार्य म्हणतात,

**सर्वं च नामरूपादि सदात्मना तु सत्यमेव स्वतस्त्वनृतमेव ।**

ज्ञानानंतर ब्रह्माशी ऐक्य करून नामरूपे सत्य आहेत व निराळी मानल्यास मिथ्या आहेत. ज्ञानाने प्रपंचाचा बाध झाल्यावरही नामरूपे राहतात व ती ब्रह्माशी ऐक्य पावतात, तेव्हा पुनः त्याचा बाध कशाने करावयाचा? म्हणून ज्ञानानंतर जे राहते त्याची पारमार्थिक सत्ता मानावयाची नाही, तर कोणाची सत्ता मानायची. व्यावहारिक व प्रतिभासिक ह्या ज्या अज्ञानजन्य सत्ता होत्या त्या ज्ञानाने निवृत्त झाल्यावर शेष राहिलेली जी पारमार्थिक सत्ता, तीच ज्ञानानंतर शेष राहिलेल्याची सत्ता होणार नाही काय?

(३) सुवर्णालंकार किंवा जललहरी हे दृष्टान्त ज्ञानानंतर पारमार्थिक स्वरूपाने अनुभवाला येणाऱ्या सच्चिदानंदरूप जगाला लाविले आहेत. वास्तविक जग सच्चिदानंदरूप असून अज्ञानामुळे तसे अनुभवाला न येता जेव्हा ते ब्रह्माहून निराळे, जड, विनाशी भ्रमाने युक्त अनुभवाला येते, तेव्हा ते जग काल्पनिक असल्यामुळे, त्या जगाचा प्रत्यय कसा येतो हे उदाहरणाने सांगताना रज्जुसर्पाचा दृष्टांत देतात. जड विनाशी जगही जीव सत्य मानतो. समानसत्तेत विरोध असतो म्हणून सत्य मानलेले जग सत्यब्रह्माच्या दर्शनाला अडथळा करिते. ज्ञानाने नामरूपात्मक जगाच्या सत्यत्व बुद्धीचा, जगाच्या भिन्नबुद्धीचा- जड विनाशी वगैरे बुद्धीचा नाश झाला की, सर्व नामरूपपसारा सच्चिदानंद भासूं लागतो व म्हणून या प्रकारच्या जगाच्या अनुभवात परमात्मरूप लोपत नाही, तर अधिक उघडे होते म्हणून -

**झालेनि जगे मी झाके । तरी जगत्वें कोण फाके ।**

असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटले आहे.

(४) शिव हा स्वतः शबल नाही कारण तो स्वतःचे ठिकाणी माया मानीत नाही. किंवा मायेचा अंगीकार करीत नाही. त्याला मायाच दिसत नाही तर मायेचा अंगीकार कसा करणार ! पहिले आम्ही बद्ध होतो व आता मुक्त झालो असा ज्या ज्ञान्यांना अनुभव येतो त्या ज्ञान्यांनाच एकदा मुक्त झाल्यावर पुनः मायेचा अंगीकार करता येणे शक्य नसते. नित्यमुक्त परमेश्वराला मायेचा अंगीकार करणे तर

सुतराम्

शक्य नाही. म्हणून परमात्मा स्वतःचे दृष्टीने शबल नाही. मायिक जीवांना त्यांच्या मायेमुळे तो त्यांना शबल दिसतो. मेघाचे योगाने सूर्य झाकोळला गेला हे काही सूर्याचे दृष्टीने म्हणणे नसते. पाहणाऱ्याच्या व सूर्याच्या मधे मेघ असतात, ते पाहणाऱ्याच्या दृष्टीला प्रतिबंध करितात व त्यामुळे पाहणाऱ्याला सूर्य झाकोळल्यासारखा वाटतो. त्याप्रमाणे जीवच शबल असतो म्हणून जीवालाच परमात्मा जवळ वाटतो. त्यातही जगत्कर्ता जो शिव आहे तो नाथांच्या अनुभवाप्रमाणे सामान्य चिदानंदरूप आहे किंवा सद्रूप आहे असे म्हणा आणि नामस्मरणादी भक्तीचे आलंबन होणारा सगुण साकार श्रीहरी हा आनंदरूप. नाथांचे म्हणणे वर दिलेच आहे. साकार निराकार यांचा भिन्नपणा कधीच नसतो, म्हणून शबल रूपाने जगलीला व सगुण साकार रूपाने अवतार लीला ह्या दोन्ही लीला एकाच परमात्म्याच्या सद्रूप-चिद्रूप-आनंदरूप अशा अंशप्रतीतीने प्रतीत होतात. आत्मज्ञान होत नाही तोपर्यंत ह्या सर्व लीला जीवाला शबलाच्या व व्यावहारिक वाटाव्या हे योग्यच आहे.

(९) अज्ञान आहे तोपर्यंत द्वैताचा व अद्वैताचा विरोध भासतो कारण अद्वैत मूळचे खरे आहेच व अज्ञानी द्वैतही खरे मानतो; म्हणून अज्ञान आहे तोपर्यंत द्वैत व अद्वैत यात विरोध वाटतो. पण आत्मज्ञानाने अद्वैत सत्य व द्वैत खोटे असे पक्के कळून चुकल्यावर आचार्य म्हणतात,

''**अद्वैतं परमार्थो हि द्वैतं तद्भेद उच्यते**''

द्वैत हे अद्वैताचे कार्य होऊन जाते म्हणजे कार्यकारणाचे जसे अनन्यत्व असते तशा दोन्ही अवस्था परमार्थभूत होतात. अद्वैत न मोडताच ब्रह्मवस्तु आत्मप्रेमाने द्वैतरूप होते, असे सर्व संत मानतात. द्वैत हे अद्वैतावरच भासते. अद्वैताचा बोध राहून द्वैत भासले तर ते द्वैत अद्वैताला बाधक होत नाही. विदेहमुक्ति होईपर्यंत द्वैताचा भास राहतो; म्हणून तेवढ्या भासमात्र द्वैताचा आश्रय करून भक्ती संभवते.

(६) म्हणून खरी भक्ति ज्ञानानंतर होते. **''मी जाहलिया संभवे । भक्ति माझी''** असे माऊली म्हणते.

(७) श्रद्धा, ज्ञान, ध्यान, प्रेम, ह्यांची जोड राहिल्यास नामस्मरण सहज होईल यात शंकाच नाही,

पण साधकाने निश्चय केल्यास तोही अभ्यासाने सतत नामस्मरण करू शकतो, असा अनुभव आहे. अर्थात त्या साधकाला व्यवहाराकडे दुर्लक्ष करायला पाहिजे तरच अभ्यास होऊ शकतो.

(८) ही चूक झाली खरी. ग्रंथ संदर्भ पुढे देता येईल. कृपा लोभ असावा.

*- आपला, नारायण पंडित.*

## पत्र ३ रे : श्री. कुळकर्णी

**॥श्रीज्ञानेश्वरमाउली ॥**

श्री. कुळकर्णी यांस सा. न. वि. वि. आपले पत्र पावले. आपण विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खाली देत आहे.

प्रश्न १ - परमार्थाचा वारा - ज्या सद्‌गुरूच्या विषयी संतासंतात विरोध आहे. तेव्हा सच्चा कोण व कां ?

*पूर्वार्ध*

उत्तरः- गुरुविषयी संतासंतात वाद नाही. वेदान्तात स्वानुभवी गुरूचीच गरज असते. व तशा गुरूची सर्व संतांनी गरज दाखविली आहे. रामदासांनी अननुभवी गुरूची निंदा केली आहे.

*उत्तरार्ध*

परमार्थात वैराग्यही मुख्य आहे. मुमुक्षू संसारात सांपत्तिक स्थिती असावी अशी इच्छा करीत नाही. तशी इच्छा वैराग्याला साधक नसते. कशीही स्थिती असो मुमुक्षू त्यातच समाधन ठेवून परमार्थाचा प्रयत्न करतो. बुद्धिमांद्य किंवा जाड्यता ईश्वरभक्तीशिवाय नाहीशी होत नाही. असा प्रयत्न होण्यास पूर्व काही जन्म व उत्तर काही जन्म लागतीलच. सर्व प्रयत्न, भगवंताकडे चित्ताची आतुरता वाढविण्यात व सद्‌गुरूची प्राप्ती होण्यात परिणाम पावतात.

२- जगन्नियंता एकच आहे. त्याचे सगुण व निर्गुण असे दोन्ही प्रकारचे वर्णन आहे. सगुण म्हणजे मायागुणयुक्त या अर्थाने. जीव तसा सगुण आहे, परमेश्वर नाही. तो त्रिगुणरहित आहे. त्रिगुणरहितालाच निर्गुण म्हणतात. असा निर्गुण परमात्मा सगुण आहे म्हणजे तो षड्‌गुणैश्वर्यसंपन्न सर्वशक्ति आहे. असा अर्थ. त्याचेच सृष्टिकार्याकरिता त्रिगुणाचा आधार कल्पून ब्रह्मा, विष्णु, महेश्वर हे कल्पित भाग आहेत. वस्तुतः माया व गुण यांचे पलीकडे आहे म्हणूनच तो मायानियंता होतो व त्याला चतुर्थ म्हणतात. नारायणीय धर्म श्रेष्ठ आहे. त्यालाच पांचरात्र धर्म व भागवतधर्म म्हणतात. त्या धर्माचे अनुष्ठान करणारे भक्तही श्रेष्ठ होत.

३- सर्व धर्मसंस्थापक परमेश्वराचे अंशच समजले जातात. हे धर्मसंस्थापक परमेश्वराचे शक्त्यवतार मानले जातात. शक्त्यवतार म्हणजे विवक्षित पंथ स्थापण्यापुरतीच त्यांची शक्ति असते. सर्व धर्मात अहिंसेचे वगैरे तत्त्व सारखेच मानलेले आहे. पूर्णसाक्षात्कारी पुरुष निराळे व भगवंताच्या सृष्टीतील काही कार्य - (धर्मस्थापनेसारखे) करण्याकरिता ज्यांना परमेश्वराचे थोडे सामर्थ्य प्राप्त झाले असे पुरुष निराळे. पण परमेश्वराचे आज्ञेनेच ते कार्य करावयाला येतात. त्या धर्माचे अनुयायी तशाच प्रकारचे अधिकारी असतात.

अमानित्वादी धर्म साधकासाठी सांगितले असून त्या धर्माने युक्त अंतःकरण अमानित्वादी धर्मसंपन्नच असते. बाह्य आकार एखादेवेळी प्रारब्धामुळे विरुद्ध दिसतो. भक्त मात्र तसे असतात. ज्ञानी अर्धसाक्षात्कारी असतात, तर ज्ञानी व सगुणभक्त पूर्ण साक्षात्कारी असतात. समाधिनिष्ठ स्थितप्रज्ञ कर्मयोगी राहू शकत नाही, हे मत वेदान्तास व पूर्ण साक्षात्कारी पुरुषास मान्य नाही. पण काही तरी करणे म्हणजे मात्र कर्मयोग मात्र नव्हे. ईश्वराची आज्ञा पाळून ईश्वराला कर्म अर्पण करणे याला कर्मयोग म्हणतात.

किंवा कर्त्यावाचूनच कर्म आहे असे समजणे निष्कामकर्मयोग आहे.

४- आपले म्हणणे बरोबर नाही. अमृतानुभवातच नाही, तर सर्व साक्षात्कारी पुरुष अज्ञानाचे खंडण करतात. कारण ते कल्पित आहे. अज्ञान अवस्तु आहे. म्हणूनच त्या अज्ञानाच्या नाशाकरिता जी ज्ञानवृत्तीची कल्पना केली जाते, तिचेही खंडण करणे जरूर आहे. हेही सर्व साक्षात्कारी पुरुषांना संमत आहे. आपण ज्ञानखंडणाबरोबर ज्या ज्या गोष्टींचा त्याग करावा लागतो म्हणून लिहिले, त्यापैकी ज्या गोष्टी अविद्याजन्य आहेत त्यांचा अज्ञान नाशाबरोबर नाश होऊन, या अज्ञानजन्य गोष्टींच्या अपेक्षेने मानलेल्या गोष्टीची सापेक्षता नाहीशी होते. व त्या अकृत्रिम भावस्वरूपाच्या ठिकाणी राहतात. त्या नाश पावत नाहीत. सर्व वादी ब्रह्म एकच मानतात. दोन ब्रह्म कोणी मानित नाहीत. मग सर्वांचे असे

अद्वैतच एक असे सिद्ध होत नाही काय?

ज्याप्रमाणे एम.ए. झालेला पुरुष मराठीच्या चौथ्या वर्गाच्या मुलासाठी ग्रंथ लिहूं लागल्यास त्या मुलाच्या ग्रहणशक्तीप्रमाणे तो ग्रंथ करील. आपल्या ज्ञानाप्रमाणे ग्रंथ करणार नाही. त्याप्रमाणे परमेश्वरांनी निरनिराळ्या आचार्यांकडून निरनिराळ्या अधिकाऱ्यांकरिता द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादी निरनिराळी मते प्रगट करविली हेच खरे. अधिकाऱ्याने आपल्या मतावर दृढ असावे एवढ्याकरिता खंडनग्रंथाचे प्रकार आहेत. क्रमाक्रमाने द्वैत अधिकारी अद्वैती होतो.

गीतारहस्यकाराची गणना वरील सदरात करणे कठीण आहे. कारण त्यांनी नवीन काहीच सांगितले नाही. त्यांचा सिद्धान्त जुनाच आहे. त्यांचा कर्मयोग म्हणजे नांव दुसरे आहे; पण भक्तिमार्गच होय. भगवंताला सर्व कर्म समर्पण करणे हेच गीतेतील कर्ममार्गाचे स्वरूप व यालाच गौणभक्ती म्हणतात. तीच पुढे ज्ञानोत्तर भक्ती होते.

**व्यासाचा मागोवा घेत । भाष्यकाराते वाट पुसत ।**

यात भाष्यकार म्हणजे शंकराचार्यच होत यात शंका नाही. सर्व ज्ञानेश्वरीत शंकराचार्यांचेच जगन्मिथ्यादि सिद्धान्त श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी विशद केले आहेत. दुसऱ्या कोणत्याही आचार्यांचे सिद्धान्त ज्ञानेश्वरीत आले नाहीत.

**''जे खळाची व्यंकटी सांडो''** इत्यादी थट्टा किंवा लोणकढी थाप व **''ॐ नमोजी आद्या''** या ओवीशी त्याचा विरोध कसा, हे मला समजले नाही.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी असे जे वरदान मागितले तसे ते वरदान लोकांनी काही न करता, लोकांचे ठिकाणी सफल व्हायला पाहिजे असे आपले म्हणणे आहे की काय? **श्रीज्ञानेश्वरीचे पठण करणाऱ्यांचे ठिकाणी त्याच्या श्रद्धेनुसार (पसायदानातील वरदान) सफल होतेच हे मी प्रतिज्ञेवर सांगतो.** श्रद्धा नसल्यास ती अश्रद्धा प्रतिबंधक होते. हे नियम सर्वत्र लागू आहेत. भगवंताने अर्जुनाला गीता अध्याय ९ मध्ये असेच सांगितले आहे. ''ती थट्टा आहे, आत्मवंचना किंवा आत्मप्रौढी आहे'' अशी शंका घेणे अत्यंत अधमपणाचे होईल. वेदान्त हा संस्कृत भाषेतच असल्यामुळे मराठी भाषेतही तो उतरविला जाऊन मराठी भाषेंतही त्याचा सुकाळ व्हावा अशी महाराजांची इच्छा आहे.

६. सत्य व असत्य यातील फरक किंवा धर्माधर्माचा विवेक साक्षात्कारी पुरुषाशिवाय समजत नाही, हे मी आपल्या ''आर्यधर्मोपपत्ति'' नांवाचे ग्रंथात सिद्ध केले आहे.

डॉ. पेंडसे माझे शिष्य नाहीत किंवा त्यांचे व माझे जाणे येणेही नाही. ते मला ओळखतात व मी त्यांना ओळखतो इतकेच.

ज्ञानेश्वरीची सुरुवात व शेवट नजरचुकीने झाला हे आपले म्हणणे बरोबर नाही. कारण वामन पंडित, महाराजांच्या पासंगासही लागत नाहीत. लोकमान्य जाणून बुझून राजकारणी. त्यांनी आपल्या ग्रंथात अनुभवाचे दृष्टीने पुष्कळ चुका केल्या आहेत. आपल्या लिखाणाचा जसा अर्थ लक्षात आला तसे उत्तर दिले. कांही ठिकाणी स्पष्टबोध झाला नाही म्हणून आपल्या प्रश्नाच्या आशयानुसार उत्तर दिले की नाही हा मला संशय आहे. हे आपण पाहून घ्यावे. कळावे.

*आपला, नारायण पैकाजी पंडित.*

## पत्र ४ थे : श्री. जोशी

**॥श्रीज्ञानेश्वरमाउली ॥**

श्री. जोशी यांचे चरणी कृ.सा.न.वि.वि.

आपले पत्र पावले. मी खेड्यावर गेल्यामुळे येथे परत आल्यावर मी आपले पत्र पाहिले. भगवान् श्रीकृष्ण ''ब्रह्मणोहि प्रतिष्ठाहम्'' मी ब्रह्माची प्रतिष्ठा आहे असे गीतेत म्हणतात. त्याचा अर्थ असा आहे. परब्रह्माच्या दृष्टीने पहाता परब्रह्म अत्यंत अद्वैतरूप असल्यामुळे त्यात आधार व आधेयभाव मानिता येत नाही.

पाण्यावर लहरी उठली असता पाण्याला 'काही एक बदल झाला' असे ज्ञानच नसते, म्हणून त्याच्या दृष्टीने पाहता मी लहरीला आधार आहे असे ज्ञान पाण्याला होत नाही. पाण्याची ही लहरी उठत असूनही जी निर्विकल्प स्थिती म्हणजे जाणीवरहीत स्थिती असते तशी जाणीवरहित निर्विकल्प स्थिती, पाण्यावर (लहरी) उठली (असे) जाणणाऱ्या मनुष्याची नसते. तो मूळ पाण्याच्या अवस्थेत थोडा बदल झाला असे समजतो. त्याप्रमाणे परब्रह्म अखंड निर्विकल्प आहे. अग्नीला जशी उष्णतेची जाणीव होत नाही तशी परब्रह्माला आपल्या स्वरूपाची जाणीव होत नाही तशी परब्रह्मात ज्ञातृज्ञेय भाव उत्पन्न होत नाही. परब्रह्माला

आपल्याहून निराळे पाहणारा जीव परब्रह्माचे ठिकाणी स्फुरण झाले व ते सविकल्प झाले असे पाहतो. त्याचे ठिकाणी परब्रह्माच्या सविकल्प निर्विकल्प किंवा विवर्तसहित विवर्तरहित स्वरूपाची जाणीव उत्पन्न होते. हा सविकल्प निर्विकल्प असा भेद ब्रह्मदृष्टीने परब्रह्मात मुळीच नाही.

पाण्यावरील लहरीप्रमाणे परब्रह्म वृत्तिरूपाने स्फुरण पावले असता अत्यंत अद्वैतपरब्रह्मात जे दोनपण दिसते ते दोनपण नसून एकपणच आहे, हे पटवून देण्याकरिता भगवंतानी **''ब्रह्मणोहि प्रतिष्ठाहम्''** असे म्हटले आहे. पहिल्या ब्रह्मशब्दाचा अर्थ शक्तिरूपाने स्फुरण पावलेले सविकल्प ब्रह्म असा असून त्या ब्रह्माची प्रतिष्ठा म्हणजे निर्विकल्प स्वरूपहि मीच आहे असे भगवंताचे म्हणणे आहे. सविकल्प स्वरूप व निर्विकल्प स्वरूप दोन्ही एकच आहेत. म्हणजे सविकल्प ब्रह्म असे काही नाही, सर्व निर्विकल्पच आहे, असा वरील भगवद्वचनात श्रीकृष्णमूर्तीचा आणि ब्रह्माचा अत्यंत अभेद दाखविला आहे.

पाण्यावर उठलेली लहरी पाण्याचा विवर्त आहे खरा पण ती पाण्याची लहरी पाण्याच्या ज्या पृष्ठभागावर उठली तो पृष्ठभाग तेवढा लहरीला आश्रय होतो व मर्यादित लहरीला आश्रय झालेला पृष्ठभागही मर्यादित भासतो. मर्यादितपणामुळेच जशी लहरी पाण्याची विवर्त म्हटली जाते हेच अनध्यस्त श्रीकृष्णस्वरूप होय, व ते स्वरूप ब्रह्माची म्हणजे सविकल्प ब्रह्माची किंवा शक्तिस्फुरणाची प्रतिष्ठा म्हणजे आधार होते. ज्याप्रमाणे लहरी म्हणजे पाणीच त्याप्रमाणे शक्तिस्फुरणही ब्रह्मच होय आणि लहरी जशी अनध्यस्त विवर्त असते तसे श्रीकृष्णाचे प्रगट झालेले अवतारही अनध्यस्त विवर्त आहे.

आपण विवर्त व विवर्ताधिष्ठान यांचा भेद मानिता म्हणून आपल्या शंका तशाच राहतात. शुद्धब्रह्म सर्वांना म्हणजे जगत् जीव यांना आश्रय आहे. पण ते साकार होऊन आश्रयस्थान होत नाही हेच मी लहरी व लहरीला आधार असणारा पाण्याचा पृष्ठभाग यांचा दृष्टांन्त घेऊन वर सांगितले आहे. ब्रह्मसूत्रांतील आरंभीच्या अध्यास भाष्यातही हे सांगितले आहे व त्या भाष्यातील हा मुद्दा मी अमृतानुभव कौमुदी पान १०३ वर ''दोनपणाहि निरूपाधिकच म्हणजे शुद्धच'' याचे स्पष्टीकरण वाचून पहावे. शुद्धात आधाराधेय भाव नसतो. ते आपल्याच आधाराने असते. शुद्ध साकाराचा व निराकाराचा अत्यंत अभेद असतो किंवा नामाचाच भेद असतो, हे श्रीज्ञानेश्वरमहाराजानी,

**अगा ब्रह्म या नांवा । अभिप्राय मी पांडवा ।**
**मीचि बोलिजे आघवा । शब्दी इही ॥४०५॥**
**पैं मंडळ आणि चंद्रमा । दोन्ही नव्हती सुवर्मा ।**
**तैसा मज आणि ब्रह्मा । भेद नाही ॥४०६॥ ज्ञाने अ.१४**

म्हणून सगुणही निराकार असते व निर्गुणही निराकार असते. जेव्हा वस्तूची सर्व देशात व सर्वकाळी व सर्व वस्तूत व्यापकता जाणली जात नाही व केवळ एकदेशातच एकाकाळी व एका वस्तूपुरतीच तिची मर्यादा जाणली जाते तेव्हा त्या वस्तूची निराकारता नाहीशी होऊन साकारता भासते. अशी साकारता भौतिक म्हटली जाते. ही साकारता जीवाची व जगातील वस्तूची आहे. - पण श्रीकृष्णादि परमेश्वराची साकाररूपता अशी नाही. श्रीकृष्ण परमात्मा एकदेशी साकार दिसतो तरी तो सर्व देशात, सर्व वस्तूत व सर्वकाळी साकार रूपानेच व्याप्त असल्यामुळे त्याचे साकाररूप निराकारही आहे. एका विवक्षित रूपातच त्याची मर्यादा नाही व त्याबरोबर तो साक्षी व सर्वज्ञ सर्वशक्तिही असतो. श्रीकृष्णच आश्रितरूप विवर्त व श्रीकृष्णच आश्रयरूप विवर्त आहे. कळावे.

*आपला, दासानुदास*
*नारायण पंडित*

## पत्र ५ वे : श्री काशीनाथ जनार्दन आठवले

**॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥**

सा. न. वि. वि. आपले पत्र पावले. मजकूर समजला. पत्राचे उत्तर पुढील प्रमाणे आहे.

**विधात्याहि शरण जाता । नुठी गतायु पंडुसुता ।**

असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात. यावरून मृत्यु टळत नसून त्याच्या टाळण्याची खटपट करणे व्यर्थ आहे, असे सिद्ध होते. पण प्रसंगविशेषी मेलेले जिवंत करण्याचे चमत्कार काही सत्पुरुषांकडून झालेले आहेत. तेव्हा गंडान्तर किंवा अपमृत्यु टळू शकतो असे अनुमान काढल्यासच वरील विरोध नाहीसा होतो. गंडान्तरादि टाळण्याचे चमत्कार होण्याला परिस्थितीही थोडी निराळीच असायला हवी असते.

ज्याला चमत्कार दाखववावयाचा असतो त्याच्याकडून निःसीम प्रेमपूर्वक चमत्कार दाखविणाऱ्या महात्म्याची सेवा होणे जरूर असते व तेवढीच त्याची वृत्ति त्याच्या परमार्थात आड येत असली पाहिजे. किंवा पूर्वजन्मात एखाद्या महात्म्याची सेवा झाली असल्यासहि या जन्मातच अनायासेच त्या सत्पुरुषाला . . . . जन्ममृत्यु काढून टाकावे लागतील. म्हणून विषयासक्तांना दैविक उपाय कांहीही गुण देत नाहीत. त्यांनी औषधोपचारादी लौकिक उपायच करून पाहावेत व स्वस्थ बसावे. याशिवाय गत्यंतर नाही.

आकाशादि सम व व्यापक पदार्थांचा असा स्वभाव आहे की, जो जितका सांठवेल तितकेच हे पदार्थ त्यांच्यात जास्त साठविले जातात कर्त्याच्या प्रयत्नापेक्षा स्वतःचा जास्त प्रयत्न करून सांठविण्याकरिता नेमलेल्या जागेपेक्षा जास्त जागा ते व्यापू शकत नाहीत.

परमात्मा व सत्पुरुष हेही समबुद्धीचे असल्यामुळे जो जितका लगट करून प्रेमपूर्वक त्यांचा आश्रय घेतो तितकाच ते त्याला आश्रय देतात. प्रयत्नापेक्षा स्वतःच्या प्रयत्नाने त्याला आश्रय देण्यात त्याचे समत्व नष्ट होत असल्यामुळे ते तसे करीत नाहीत.

सारांश, दैविक उपाय जरी मृत्यु टाळणारा असला तरी तो दृढ श्रद्धाळु व अनन्य अशाच भक्तांना उपयोगी असल्यामुळे साधारण माणसाच्या उपयोगी नाही.

**तयाचे हृदयी गवसणी । व्यापका मज ।**

असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

याचा अर्थ असा आहे की, ज्याप्रमाणे तंबुऱ्याची गवसणी कोणत्याही अपायकारक आघातापासून तंबुऱ्याचे संरक्षण करण्याकरिता असते, त्याप्रमाणे कोणत्याही कामनेचा आघात लागू नये म्हणून भक्तजन प्रेमाच्या गवसणीत परमात्म्याला झाकून ठेवतात. त्याला उघडा पडू देत नाहीत. ज्याप्रमाणे गवसणी नसलेला तंबुरा कोणत्याही अपायास सन्मुख असतो, त्याप्रमाणे प्रेमाची गवसणी नसलेला परमात्मा कोणत्याही कामनेस सन्मुख होतो.

आपली प्रेमाची वस्तु तुम्ही चौघांच्या वापरीला मोकळी सोडाल काय? सोडल्यास दया येऊन तो मृत्यु टाळतो. उदाहरणार्थ शिवलीलामृतातील भद्रायुचे आख्यान पाहावे. किंवा छलपूर्वक एखाद्या महात्म्यावर संकट टाकले व त्या महात्म्यांनी परमात्म्यावर भार घातला तरीही असा चमत्कार होतो.

आपण उल्लेख केलेल्या गृहस्थाकडून निःसीम प्रेमाने श्रीज्ञानेश्वर महाराजांची सेवा झाली नाही व पुढे होणे शक्य नाही; म्हणून पहिल्या परिस्थित्यनुसार चमत्कार घडून असा दुर्धर रोग नाहीसा होणे शक्य नाही. दुसरी परिस्थितीही दिसत नाही. व तिसरी परिस्थिति आणण्याचा प्रयत्नही आपल्या गृहस्थाकडून होणे शक्य नाही; कारण त्याकरिताही तीव्र प्रयत्न पाहिजे म्हणजे ''तुम्ही तिची प्रकृति सुधारविणार नाही तर मी आपल्यावर प्राण देतो'' असे त्या सत्पुरुषास निक्षून सांगून सर्व प्रयत्नांचा त्याग करून तदेकचित्त होऊन प्रकृती न सुधरल्यास प्राण देईनच असा दृढ निश्चय पाहिजे. अशा रीतीने भक्तांचेच लळे पाळले जातात. अभक्तांचे नाही, हे पक्के ध्यानात ठेवावे. अभक्तांचे लळे पाळू लागल्यास जगातून आपल्या प्रेमाची गवसणी आपण त्या वस्तूला केली म्हणता येईल? किंवा ज्यांच्या वापरीकरिता ती मोकळी सोडली त्यांना तुम्ही आपल्या प्रेमाची गवसणी घातली, असे म्हणता येईल? असो. अशा कामात मी पडू इच्छित नाही. त्यातही निःसीम श्रीमहाराजांचा भक्त सांपडत असल्यास गोष्ट निराळी. पण ही स्थिति आपल्या कोणाच्या ठिकाणीच जर नाही तर इतरांच्या ठिकाणी ती राहील असे मला वाटत नाही.

अशी स्थिति राहणारा स्त्रियेच्या मरणामुळे कशाला दुःखी होईल.

*आपला*

*नारायण पंडित*

## पत्र ६ वे : श्री. शंकरराव जोशी पुणे

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

ह. भ. प. जोशी महाराज यांचे चरणी कृ. सा. न. वि. वि.

आपली पत्रे पावली; पण कामाच्या व्यग्रतेमुळे उत्तरे देऊ शकलो नाही. लग्न मौंजींची गडबड, शेतीच्या व्यवस्थेकरिता खेड्यावर जाणे, इत्यादीमुळे वेळ झाला नाही. असो त्यांचे उत्तरे मी देईन. तूर्त आज पावलेल्या पत्राचे उत्तर देत आहे.

(१) भाषेवरून ग्रंथाचा लेखक एकच किंवा भिन्न हे ठरविणे योग्य नव्हे. कारण एकच ग्रंथकार भिन्न भिन्न भाषाशैलीत ग्रंथ लिहू शकतो. श्रीगुलाबरावमहाराजांचे ग्रंथ याचे उदाहरण आहे. म्हणून ग्रंथकार एकच की भिन्न हे ठरविण्याचे भाषाशैली हे निश्चित गमक नव्हे. निश्चित गमकावाचून कोणतेही अनुमान काढणे प्रमाणभूत होत नाही. नुसता संशयच उत्पन्न करण्याला कारण होते. बाकी काही नाही. साधारण माणसांची भाषाशैली ठरून गेलेली असते. म्हणून प्राप्तपुरुषांच्या ठिकाणीही तसेच असते असे मानणे हे अज्ञानाचे लक्षण आहे.

**कोणासाठी नेणो झाले हे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।।**

अमक्यासाठी निर्माण करायचे वगैरे उद्देश, ग्रंथ निर्माण होताना संतांचे अंतःकरणात नसतात. 'अर्थ स्पष्ट कळेल असे लिहिणे' किंवा 'सहजासहजी अर्थ न कळेल' हे सामान्य व विशेष प्रसंगावर अवलंबून असते. सामान्य वेदान्त कोणाला कळला तरी हरकत नसते; म्हणून वेदान्ताची सामान्यचर्चा सर्वास कळण्याजोगीच होते; पण अनुभवाचे प्रकार वैराग्यावाचून लाभकारक नसतात व सामान्य भाषेत ते सांगताच येत नाहीत; म्हणून ते सांगितले तरी सहजासहजी कळणारे नसतात. वेदान्तगुह्य सांगूनही वैराग्यशील अधिकारीच समजू शकतात व विषयीपुरुष त्याचा विपरीत अर्थ करतो. इंद्र व विरोचन यांची कथा याविषयी प्रसिद्ध आहे. असे करण्यात, 'आपला मोठेपणा राखण्याचा आरोप आपण जो केला तो गर्ह्य आहे.' यावरून आपल्यासारखीच सत्पुरुषांच्या अंतःकरणाची स्थिती असते, असे आपण समजता, असे दिसते.

''अंतरंगचि अधिकारिये'' या ओवीत अंतरंग साधन दृढ झालेल्या साधकासच सांगितलेला वेदान्त फलदायी होतो, असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणणे आहे. शमादिषट्‌काला अंतरंग साधन म्हणतात.

**तोंड भरो कां विचारा । अंतरी विषयासी थारा ।**
**तरी कोटी वर्षे धनुर्धरा । न पविजे माते ।।**

तोंडाने वेदान्त विचार बोलता येतो खरा; पण जोपर्यंत अंतःकरणात विषयाची गोडी आहे तोपर्यंत परमात्मप्राप्ती दुर्लभ आहे. हा या ओवीचा अर्थ आहे.



(२) आपल्या ठिकाणी दोन ज्ञाने आहेत. एक वृत्तिरूप व दुसरे चिन्मात्र वृत्तिरहित. अद्वयपणाचे ज्ञान हे वृत्तिरूपच आहे व त्या अद्वयपणाला जाणणारे ज्ञान ज्ञानमात्र वृत्तिरहित आहे. पहिले ज्ञान सविकल्प आहे व दुसरे ज्ञान निर्विकल्प आहे. ज्ञानाने अद्वैतपणा बाणतो व भक्तीने अद्वैतपणाला जाणणारी जी ज्ञप्ति, तद्रूप होतो. म्हणजे निर्विकल्प होतो. ही निर्विकल्पदशा द्वैत व अद्वैत यांच्या रहित आहे. ज्ञानाने अद्वैत होणे व भक्तीने साक्षिरूप होणे हे नुसते द्वैतकल्पना निवृत्त होण्याने व अद्वैतकल्पना निवृत्त होण्यानेच होते. दुसरे काही नाही. ज्ञानोत्तरभक्ति साक्षिरूपच आहे. म्हणजे द्वैत-अद्वैत कल्पना निवृत्त झाली तरी आपली आवडी निवृत्त होत नाही. देहाच्या बाहेरही तोच आत्मरूप असल्यामुळे आंतबाहेर सर्वत्र आत्मप्रेम राहणे यालाच ज्ञानोत्तरभक्ती म्हणतात. त्या आत्मप्रेमाचे आलंबन निर्गुण (नामरूपरहित) असून बाहेर नामरूपस्वरूप सगुण असते. भक्तीने ज्ञान होते व ज्ञानच शेवटी राहते असा त्याचा अर्थ नाही. सच्चिदानंद ब्रह्माच्या अनुभवात शेवटी आनंद राहतो व त्याच्या योगानेच निर्विकल्प अवस्था होते.

(३) आम्ही श्रीज्ञानेश्वरी, हरिपाठ, पासष्टी, अमृतानुभव, पदे, अभंग हे सर्व श्रीज्ञानेश्वर महाराजांनी केले असेच मानतो. दोन ज्ञानेश्वर महाराज असावे असे म्हणण्याऱ्यावर ते सिद्ध करण्याचा बोझा पडतो. ते कोणीच अझून सिद्ध केले नाही. नुसती शंका उत्पन्न करून मात्र ठेवली. साशंकही ते आहेत. बाकी कोणालाच शंका नाही.

(४) ज्ञानेश्वरी अध्याय ११ - ओवी २५ यांत ''जी वैकुंठ नायकाच्या मुखातून निघाली त्या गीतेचा भाव (भावार्थ) उत्तम रीतीने मी सांगत आहे तो ऐका'' असे म्हटले आहे. ज्ञानेश्वरी भगवन्मुखातून निघाली, असे महाराज म्हणत नाहीत. आपण तसा अर्थ करीत असल्यास आपण दिलेली उपपत्ती बरोबर आहे.

(५) श्रीज्ञानेश्वरमहाराज नामधारक होतेच व नामस्मरणाने नामधारकास ''सर्वत्र वैकुंठ केले असे'' सर्वत्र वैकुंठ होते. यापेक्षा श्रीज्ञानेश्वरमहाराज वैकुंठास गेले हे काय म्हणायचे राहिले हे समजत नाही. हरिपाठ रहस्य पान २१८ पाहा म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज वैकुंठास गेले असे म्हटले आहे की नाही हे दिसेल.

हा दाखला आपण आपल्या प्रश्नात दिला आहे. मग ह. भ. प. काळे व हरिपाठरहस्य यांत श्रीज्ञानेश्वरमहाराज वैकुंठास गेले हे कसे लिहिले नाही असे आपणच पुनः म्हणता याचे आश्चर्य वाटते.

''वैकुंठास गेले'' यात जो एकदेशीयपणा आहे तो ज्ञानीभक्तांचे ठिकाणी मानणे कठीण आहे. ते वैकुंठात जात नाहीत असे नाही. व दुसरे कोठे म्हणजे येथे असतात तेव्हा वैकुंठात नसतात असेही नाही.

*(ज्ञानीभक्त, वैकुंठ व वैकुंठनायक एकच म्हणून ओवीत केलेले विधान बरोबर आहे.)*

*आपला - नारायण पंडित*

## पत्र ७ वे : श्री सदाशिवराव फडके, वकील

**॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥**

यांस कृ. सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. आपण विचारलेल्या शंकेचे उत्तर स्वतंत्रपणे असे श्रीमहाराजांचे ग्रंथात दिलेले नाही व देण्याचे कारणही नाही.

आपले अद्वैत पूर्ण सुखस्वरूप न जाणणाऱ्या अज्ञानी जीवाने या द्वैतात्मक जगताची कल्पना करून आपल्या दुःखाला कारण करून ठेवले आहे. त्यालाच क्षणोक्षणी वासनात्मक आध्यात्मिक दुःखाचा, देवादिकांपासून आधिदैविक दुःखाचा आणि जरायुजादि चार प्रकारच्या भूतांपासून होणाऱ्या दुःखाचा अनुभव येतो व त्याच्या दृष्टीने जगात ''दुःख पर्वता एवढे आहे'' असे म्हटले आहे.

वास्तविक अद्वैत सच्चिदानंद परब्रह्माच्या व्यापकतेचा विचार केल्यास त्याहून भिन्न जड- विनाशी- दुःखरूप अशी जगद्वस्तू राहण्यास जागाच नाही. या अद्वैत परब्रह्मवस्तूचे दृढज्ञान होऊन तो मीच आहे, असे कळून आल्यावर व तेथे आत्मवत् प्रेम होऊ लागल्यावर मग हेच जगत् त्या ज्ञानीभक्ताला, ही आत्मस्वरूपाची आनंदरूप लीला आहे, असा अनुभव येतो. अद्वैत ज्ञानभक्तीच्या भूमिकेवर गेल्यावर प्रॉब्लेम ऑफ इव्हिल "Problem of evil" हाही सुटतो. किंवा शास्त्रांनी सांगितलेली कर्मे, केवळ भगवंताच्या प्राप्तिकरिता म्हणून केली असता, चित्त भगवंताचे ठिकाणी स्थिर होत जाऊन मनुष्य क्रमाक्रमाने अद्वैतज्ञान भूमिकेवर चढतो व त्याचा "Problem of evil" सुटतो.

सारांश, अद्वैतज्ञान व भक्ती या भूमिका प्राप्त होत नाहीत तोपर्यंत "Problem of evil" तसाच कायम राहणार व ''**सुख पाहतां जवापाडे । दुःख पर्वता एवढे**'' हा अनुभवही सारखा येतच राहणार.

*आपला*

*- ना. पै. पंडित*

## पत्र ८ वे : श्री. काशिनाथराव आठवले

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

कृ. सा. न. वि. वि. आपले पत्र पावले. मी आपणाकडून हे पत्र येण्याचे पूर्वीच तेथे येऊन गेलो असतो; पण चि. मनोहरचे लग्न ता. ९-५-१९४० ला करण्याचे ठरल्यामुळे व घरी काहीच तयारी नसल्यामुळे व त्यातच पुनः माझा खांदा व पाय वाताने चांगलाच दुखत असल्यामुळे येऊ शकत नाही. आता लग्न जवळच ८-१० दिवसच राहिले आहे. रा. भाऊसाहेबाचे मुलीस पाहण्याकरिता काही मुलगे येणार आहेत. तरी मी लग्न झाल्यावर येतोच.

सौ. मातोश्री उमाबाई ह्यांना अत्यंत धक्का बसावा व त्यांची अस्वस्थ स्थिती व्हावी यांत नवल नाही. पण त्यांनी इतर मुलांकडे व एकंदर घरातील माणसांवर त्यांच्या शोकाचा होणारा परिणाम इकडे लक्ष देऊन शोक आवरला पाहिजे.

**अत्यंत शोकाचे वेळी वेदान्त सांगणे हेही निष्ठुरतेचे लक्षण समजले जाईल. पण हेही तितकेच खरे की अशा प्रसंगी वेदान्ताशिवाय समाधानाचा मार्गही नसतो.** प्रत्येकजण दुःखाचे प्रसंगी थोड्याबहुत प्रमाणाने वेदान्ताचा आश्रय धरूनच आपले व दुसऱ्याचे समाधान करीत असतो. ह्या वेदान्ताच्या गोष्टी देखील काही तेवढ्यापुरते समाधान करण्याकरिता म्हणून रचिल्या गेल्या नसून ते पूर्ण विचारान्ती ठरलेले सिद्धान्त आहेत. सौ. मातोश्रीस ते अवगत नाही असे नव्हे. पण प्रेमाचा हुंदका आला म्हणजे सर्व विचार मावळतो. म्हणूनच दुसऱ्याने फिरून फिरून तिला विचारावर आणले पाहिजे.

सर्व समर्थ भगवंताचा भक्त अभिमन्यु याला, आपला पूर्व संकल्प बदलवून, भगवंतांनी वाचविले नाही. तेथे दुसऱ्याविषयी बोलावयासच नको. शोकाचा परिणाम मनावर होऊन सर्व प्रपंचाची खराबी होऊं देणे बरे का, याचा विचार

केला पाहिजे. या थोड्या फार निष्ठुर शब्दांबद्दल मी मातोश्रीची माफी मागतो, पण पुनः धजून अशीच विनंती करितो की, आई! झालेली गोष्ट आपण कितीही शोक केला तरी सुधारून येत नाही. मग शोक करून काय उपयोग? जेथे बिघडलेली गोष्ट शोकाने सुधरू शकते तेथे अवश्य मरणान्त शोक करावा. भगवान् रासातून गुप्त झाल्यावर पुनः भगवान् भेटणे शक्य होते म्हणून गोपींनी मरणान्त शोक केला व भगवान् भेटलेही. म्हणून शोकाने जी गोष्ट मिळू शकते तिजकरिता अवश्य शोक करावा; पण जी गोष्ट मिळू शकत नाही तेथे शोक करणे निरर्थक नाही काय ?

यातून योग्य तो विचार घेऊन मातोश्री आपला शोक आवरील व तसे झाल्याचे मला कळवतील अशी आशा करतो. कळावे.

*- आपला,*
*नारायण पंडित.*

*पत्र -१*

*रा. रा. नारायणराव बालटे (हिरपूर-मूर्तिजापूर) यांस*

*(१)*

*तुमचे लिखित पावलो ये काळीं । आनंदाश्रु डोळीं वाचोनिया ।।१।।*
*वाचोनि गौरव चित्तीं वाटे खेद । जाणे मतिमंद अभागी मी ।।२।।*
*तुम्हीं संतजनीं द्यावी शिकवण । आंगीं अभिमान नये जेणें ।।३।।*
*ज्ञानेश्वरकन्या चरणासी सेवा । घडो हाचि द्यावा आशीर्वाद ।।४।।*

*(२)*

*आळंदीवल्लभ ज्ञानेश्वर प्रभु । आलो जी स्वयंभु पाहोनियां ।।१।।*
*एक मासवरी नव्हतोचि ग्रामीं । येऊनियां धामीं पक्ष झाला ।।२।।*
*मागील लिखितें नाहीं आली हाता । उत्तर सार्थका केविं देऊं ।।३।।*
*घडला अन्याय करोनियां क्षमा । ज्ञानेशजा प्रेमा द्यावा मज ।।४।।*

*(३)*

*स्तुती करा ऐसा नाहीं अधिकार । दीन मी पामर संतदास ।।१।।*
*स्त्रियापुत्रादिकीं पडला आदर । तुमचा उद्धार केविं करुं ।।२।।*
*नाहीं धर्मज्ञान भक्तीचा जिव्हाळा । शुद्ध पेंडवळा मिथ्याभिमानी ।।३।।*
*ज्ञानश्वरकन्याजननीचे द्वारीं । बैसलों भिकारी होवोनिया ।।४।।*

*(४)*

*बाळ विसरे माऊली । कृपाष्टि ती न्याहाळीं ।।१।।*
*तैसी झाली माझी परी । तुम्ही कृपा केली बरी ।।२।।*
*हेचि आतां विनवणी । माझी न करावी सांडणी ।।३।।*
*ज्ञानेशजा पायीं करा । मज अर्पण दातारा ।।४।।*

०००

पत्र २ रें

(१)

उदाराचा राणा ऐसी जगीं किर्ती । वंदन त्याप्रति ज्ञानराजा ।।१।।
गळला अंबुद नेले भवतापा । गुरूमायबापा नमस्कारु ।।२।।
साष्टांग करोनी तुम्हा नमस्कार । पाठवी उत्तर लिखीताचे ।।३।।
ज्ञानेशजामाय दाखवी सुपंथ । आशीर्वाद तेथ वोपियेला ।।४।।

(२)

आघवी लिखीते पावली मजसी । नेदी उत्तरासी आळसानें ।।१।।
लिखीत वाचोनी वाटे समाधान । जे कीं नारायण प्रेम चित्तीं ।।२।।
तोचि एक म्हणो कुळीं भाग्यवंत । जया भगवंत आवडला ।।३।।
ज्ञानेशजामाये धाडियेला मित्र । निजकृपापात्र करावया ।।४।।

(३)

बिकट हा मार्ग नाकळे मजसी । नाहीं विरक्तीसी म्हणूनिया ।।१।।
तुम्हासम मित्र जोडला विरक्त । तेणें भाग्यवंत झालों आतां ।।२।।
शिष्य होवोनियां आपुला उद्धार । करोनी उद्धार करा माझा ।।३।।
गोरक्षें रक्षिला मच्छेंद्र सदगुरू । तैसे साहाकारु व्हावे मज ।।४।।
ज्ञानेशजा माय ठेवोनी प्रमाण । नोहे हें वचन उपरोधी ।।५।।

(४)

संसारीं राहोनी अलिप्त विषयीं । वाचे शेषशायी नाम सदा ।।१।।
विषयाचे जरी विधीनें सेवन । त्यागाचें समान जाणावें ते ।।२।।
भूतीं समष्टि दीनावरी दया । तरी त्या कासया जप तप ।।३।।
कलीयुगामाजीं करावे कीर्तन । ज्ञानेशजे खूण सांगितली ।।४।।

(५)

न लगे सोडूनी जावे मायबापा । जरी नोहे तापा हरिनामीं ।।१।।
घरींच राहोनी करा एक चित्त । आवडी अनंत आठवावा ।।२।।
हरिनामाविण कोठेंचि सखया । आग्रह तो वायां असूं नये ।।३।।
बळकट धरी उपास्याची कास । चित्तीं नको आस कशाचीहि ।।४।।
ज्ञानेशजा माय न टळे नेमासी । धरी त्या पोटासी भावबळें ।।५।।

(६)

नामेविण पळ नसे रिति वाणी । तरी मोक्षदानी आकळतो ।।१।।
नामसंकीर्तनीं तल्लीन मानस । रात्री न दिवस नेणे काहीं ।।२।।
नेणे क्षुधा तृषा केऊती निमाली । निंदकांच्या बोलीं चित्त नाहीं ।।३।।
ज्ञानेशजामाय नामाचाचि छंद । लागतां गोविंद उडी घाली ।।४।।


(७)

मार्ग क्रमिल्या वाचोनी । गांवा कैसा जाय कोणी ।।१।।
केव्हां पावेन मी गांवीं । ऐसा चित्ता वाहे जीवीं ।।२।।
तरी नोहे फळसिद्धि । विण तोडिल्या उपाधी ।।३।।
गुरू दावी मोक्षवाट । शिष्याकडे खटपट ।।४।।
आले दुःखाचे डोंगर । तरी सांडूं नये धीर ।।५।।
आत्मपिंड जेणें दिला । ज्ञानेशजे प्रिय झाला ।।६।।

(८)

देहाची आसक्ति न सुटे विषय । तांतडी ते काय करोनियां ।।१।।
घेववेना जरी सतीचे वायण । उताविळपण करुं नये ।।२।।
मातापितयाची करोनिया सेवा । विषय सेवावा यथाविधि ।।३।।
सर्वही करिता संसाराचा धंदा । चित्तीं त्या गोविंदा आठवावे ।।४।।
दिसेंदिस ढ धरोनिया कास । ठेवावा विश्वास हरिपायीं ।।५।।
विश्वासेसी भक्ती मागावी देवासी । अभक्त संगासी टाकोनियां ।।६।।
रात्रंदिस होतां नामसंकीर्तन । ठसे हरिध्यान आपेआप ।।७।।
ग्रंथ ज्ञानेश्वरी नाथ भागवत ।। विवरावे अर्थ यांचे चित्तीं ।।८।।
श्रवण केलिया अर्थांचे चिंतन । तेचि रात्रंदिन मनन पैं ।।९।।
मोक्षाचे गाठोडे नाहीं कोणापाशीं । उदास देहासी तोचि पावे ।।१०।।

केलियावाचोनि देतां नये कोणा । अधिकारीपणा सामर्थ्यौनें
।।११।।
ज्ञानेशजापायीं ठेविल्या विश्वास । मग संदेहास शिवूं नये ।।१२।।
(९)
न मिळो खावया न वाढो संतान । परी नारायण कृपा करो ।।१।।
ऐसी तीव्र जीवीं धरोनी आवडी । करावा तो घडी घडी लाहो ।।२।।
होईल ते होवो हरिचिया नांवें । म्हणोनी राहावे स्वस्थ चित्तीं ।।३।।
ज्ञानेशजा माय येईल धांवोनी । निर्वाण मांडोनी आठविल्या ।।४।।
(१०)
चालत्या मारगीं वाहूं नये शंका । पावेन मी निका गांवीं केव्हां
।।१।।
क्रमियेला पंथ आतां किती दूरी । असतां हे उरी धीर नये ।।२।।
धरिलिया वाटे आनंदें चालावे । तरीच पावावे निजस्थळ ।।३।।
ज्ञानेशजापायीं घालोनियां भार । धरोनियां धीर रहा सुखें ।।४।।
(११)
कळे तैसें तुम्हां केलें निवेदन । घ्यावे समाधान होय तरी ।।१।।
विषयीं लंपट अभ्वासीं निचाड । नाहीं कोणी धड क्रिया एक ।।२।।
ऐसा सर्वांपरी कमाईचा हीन । नाहीं कोणी उन पाप एक ।।३।।
ज्ञानेशजा माय करील सांभाळ । कंठीतसे काळ विश्वासें या ।।४।।
०००



# : परम उपदेश :

वेद म्हणजे श्री गुरूंच्या उपदेशातून चोरलेले शब्द

*–मोठे महाराज*

श्रीज्ञानेश्वरकन्यासुत

श्रीस्कंदासनाथ तथा श्रीबाबाजीमहाराज पंडितांनी

चिरंजीव भैय्या घटाटे यास पाठविलेली –१७ पत्रे.

२५ फेब्रुवारी १९५४ ते ७ नोव्हेंबर १९६३

सौ.लक्ष्मी घटाटे – २ पत्रे    १६.४.१९६३/६.५.१९६३

श्रीमंत बाबासाहेब घटाटे– १ पत्र    २१ मार्च १९६४

पत्र १ ले

अमरावती २५.२.५४

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

चिरंजीव भैय्या यास अनेक आशीर्वाद.

आपले पत्र पोहचले. मजकूर वाचून समाधान वाटले. आपली उत्कंठा योग्य आहे, पण प्राप्तीच्या तळमळी इतकीच साधनाची तळमळ पाहिजे. सत्यसंकल्प परमेश्वराने आपल्या प्रारब्धा बद्दल जो संकल्प केला आहे, तो त्याला, संकल्प सत्य असल्यामुळे, बदलविता येत नाही. आपली भेटीची उत्कंठा जितकी वाढेल तितका तो काळ /सत्यसंकल्प फिरविण्याचा/जवळ येईल हे खास!

मला परमेश्वर समजत असाल तरी, सत्यसंकल्पाचा संकल्प असा वाटेल तेव्हां बदलू लागला तर तो सत्यसंकल्पच होणार नाही. तो मलाही बदलविता येत नाही.

आपल्या तळमळीची भगवंताला फत्तरावरची रेघ आहे की पाण्यावरची रेघ आहे, याची खातरी येऊ द्या. एक वर्ष अभ्यास करून किंवा दोन वर्ष अभ्यास करून मग कोठे तुम्ही परिक्षेला बसता. एकदम बसता येत नाही. त्याप्रमाणे अभ्यास पाहिजे तशी तळमळ पाहिजे व भगवंताची खाव्री झाली पाहिजे.

तुका म्हणे येथे न चाले तांतडी ।<br>
प्राप्त वेळ घडी आल्याविण ।।

हे लक्षात ठेवा. तसेच-

पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती ।<br>
सर्व भावे पती, ध्यानी मनी ।।

हे एकनिष्ठेचे लक्षण आहे. गंगा सारखी वाहत आहे. आपली तहान भागविण्या करता- एका ठिकाणी बसूनच पाणी प्याले असतां तहान भागेल की ५-७ ठिकाणी उठून पाणी पिण्याची आवश्यकता आहे? याचाहि विचार करा.

वंदनीय सर्वच असले तरी एका ठिकाणीच निश्चल होणे जरूर आहे. व जो निश्चल झाला तो एका ठिकाणाहून उठूच शकत नाही.

मी आपणास सहा महिन्यांची मुदत दिली. तीहि मुदत, वरप्रमाणे एकनिष्ठता सांभाळली तरच ! हे मी स्पष्ट सांगितले.

गाव लवकर येण्याकरिता लवकर लवकर चालणे बरें की गांव केव्हां येईल-गांव केव्हां येईल, अशी चिंता करणे बरें ! चिंता करणारा मग चालण्याला कंटाळून जातो व थकतो. म्हणून तुमच्या तळमळीची अशी भीती वाटते. म्हणून तळमळ पाहिजेच पण त्याबरोबर साधनाच्या अनुष्ठानाची तीव्रताहि वाढत गेली पाहीजे.

लिहिण्याचा राग मानू नये. मला जे योग्य वाटते तेंच मी लिहिले आहे. आमच्या श्रीमहाराजांचाहि असाच उपदेश असे.

मी काय लेकरू आहे त्यांचे! ते समर्थ आहेतच.

तेच माझ्या वचनाची पूर्ति करणार आहेत.व मला त्यांचाच भरवंसा आहे. आपणहि त्यांचाच भरवंसा धरा. कळावे.

- ना. पंडित. ०००

पत्र २.

अमरावती २५.४.१९५४

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

अनेक आशीर्वाद. आपले पत्र पावले.मजकूर समजला. आलेल्या पाहुण्याला टाकून अपण इतक्यात येणे बरें नाही. इतरांबरोबर आपण या. २.५.१९५४ रोजी रविवारीच निघावे. मी बउनेऱ्याला तुम्हाला भेटतोच. मी आपणास सहज म्हटले होते. काही पेंचात पउल्यासारखे वाटू देण्याचे कारण नाही. बाकी सर्व उतम. कळावे. - ना. पंडित. ०००

पत्र ३.

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

अमरावती २५.४.१९५४

अनेक आशीर्वाद. तुमचे पत्र आज मिळाले.

गंगेचे पिपे येथे पाठविण्याबद्दल लिहिले, याबद्दल फार आभारी आहे. मी येथे १५.६.१९५४ पर्यंत आहेच. कदाचित् कोठे गेलो तर कळवीन. विशेष कोठे जाणे होणार नाही, असे वाटते. खेड्यावर वगैरे एखाद् दिवसाकरीता गेलो तर..! पण तुम्ही येणार असल्यास मी राहीनच. मुंबई वगैरेहून आल्यानंतर थोडी सर्दी वगैरे झाली होती. पण आता बरे आहे. आपल्याला माझ्या संगतीने बरीच दगदग व त्रास झाला, त्यामुळे तुमच्याच प्रकृतीची मला काळजी वाटते. बाकी सर्व उत्तम.सर्वांना आशीर्वाद. कळावे.-ना.पंडित.

:: श्री कृष्णराव माधवराव घटाटे.%भोसला मिलिटरी स्कूल, रामभूमी, नाशिक.

पत्र ४ थे.

अमरावती ६.६.१९५४

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

अनेक आशीर्वाद. इतक्यात पत्र टाकल्यानंतर नागपूरवरून पत्र आले म्हणून हे दुसरे पत्र टाकणे भाग पडले. आमच्या मावस भावाचे लग्न ता.१५.६.५४ रोजी नागपूर मुक्कामी होणार आहे. तेव्हा मला जाणे अवश्य असल्यामुळे १५.६.१९५४ रोजी मी नागपूरला राहीन. अमरावतीला राहणार नाही. कळावे. -ना.पंडित ता.क. मी येथून १०.६.५४ लाच नागपूरला जाईन. व १५.७.५४ पर्यंत तेथे राहून, मग वटसाविद्रीचे पारणे करून चांद्याल जाईन. तेथे २-४ दिवस राहून परत येईन असा विचार आहे. -ना. पंडित.र

०००

पत्र ५ वे.

अमरावती ३०.६.१९५४

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

अनेक आशीर्वाद. आपले पत्र पावले. मी १८ तारखेपर्यंत नागपूरला होतो. आपण कॉलेजच्या काळजीने लवकर नागपूरला याल वभेट होईल, असे वाटत होते. नंतर चांद्याला गेलो व तेथून २३ तारखेला येथे आलो.

आपण २-३ तारखेलकडे याल तर हरकत नाही. आपण मिळूनच नागपूरला जाऊ. मी नागपूरला येणारच आहे तेव्हां मग उमरावतीला जाऊन काय करायचे?असे वाटल्यास इच्छेप्रमाणे करायलाही हरकत नाही.

पण आपण २।४ दिवसाकरिता कां होईना, याल तर मला आनंदच होईल. कळावे .

-ना.पंडितः

०००

पत्र ६ वे.

अमरावती २९.७.१९५४

श्रीज्ञानेश्वर माउली

अनेक आशीर्वाद. आपले पत्र पावले.

श्री माधवराव गोळवलकर यांचे वडील वारले व त्यांची आई फार शोकग्रस्त आहे म्हणून त्यांचे पत्र आल्यावरून, मी रोज रविवार ता.१.८.५४ एक्सप्रेसने नागपूरला येणार आहे. भेटी अंती पत्राचे विषयासंबंधी खुलासेवार बोलणे होईल.कळावे -ना. पंडित.

०००००००००

पत्र ७ वे.

अमरावती १९.९.१९५४

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

अनेक आशीर्वाद. आपले पत्र पावले. घरी द्रव्य व धान्य नसता उपास घडतो, यात उपास करण्याची मातब्बरी नाही. पण घरी धनधान्य असून उपास करणाऱ्याला उपासाचे फळ मिळते. त्याचप्रमाणे

क्षीण इंद्रियांनी इन्द्रियनिग्रह झाल्यास विशेष शौर्य नाही. पण सर्व रस सेवन करून इंद्रिये काबूत ठेवणाऱ्याचे खरे शौर्य आहे. **पण याचा अर्थ असा नव्हे की, ती अनावर होतील अशा परिस्थितीतच राहवे.**

**चोरी करण्यापेक्षा जसे घरी उपाशी मरणे बरे! त्याप्रमाणे वर सांगितलेल्या शौर्याच्या अभावीं इंद्रिये काबूत राहातील असाच आहार विहार ठेवावा. आपला इच्छित अभ्यास किंवा चिंतन याला बाध येणार नाही, अशीच संगतही असणे अवश्य आहे. बाकी संगत अवश्य सोडावी. कारण मनुष्याची वागणुक हितावह किंवा अहितावह होण्याला संगतच कारण आहे. साधकाने असेच वागणे हितावह आहे.**

**मी मागे सांगितले, तर ते सिद्धाकरिता होते. धन जवळ नाही तोपर्यंत, ते मिळेल असा प्रयत्न केला पाहिजे. व तें मिळविल्यावर, ते कोणी चोरून नेऊ नये म्हणून- आपण धनवान आहो असे न दाखविता, आहो तसे गरीब आहो, असे दाखविणे श्रेयस्कर असते. तसे परमार्थातही, परमार्थ बिघडविणाऱ्या सर्व परिस्थितीचा त्याग करून, त्याची परमार्थाची खटपट केली पाहिजे. व तो परमार्थ साधल्यावर मग, आपण काही साधले, असे न दाखवितां परमार्थ न साधलेल्याप्रमाणे वागले पाहिजे.**

**देव आहे ऐसी वदवावी वाणी ।**
**नाही ऐसा मनीं अनुभवावा ।।**

**-ना. पंडित.**

०००

पत्र ८ वे.

**अमरावती १.११.१९५४**

**अनेक आशीर्वाद. आपण गेल्यापासून पत्र नाही म्हणून काळजी वाटते. आपल्या मनाचा विरस झाला, म्हणून आपण अत्यंत दुःखद अंतःकरणाने येथून गेले हे दिसतच होते. दिवाळीच्या समोर आमच्या येथून आपणाला जावे लागले, याचेआम्हालाहि वाईट वाटते. पण आईवडिलांची येण्याविषयी आज्ञा असल्यानंतर, माझ्यासारख्या परक्याला आपल्याला राहून जा, असे कसे म्हणता येणे शक्य होते?**

**आल्या जाण्याने आमचा सर्वांचा आनंद मावळला. त्यांना तुमचा राहण्याचा विचार आहे, हे पूर्वी माहीत असते तर कदाचित् त्यांनी तुम्हाला नेण्याची निकड केली नसती. असो. आपली प्रकृति कशी आहे, ते कळवावे.**

**तुमच्या जाण्याने एक तुमचा फायदाच झाला. तो असा- आपण गेल्यावर तीन दिवस, श्रीमहाराज रोज जेवीत असत तसे मुळीच जेवले नाहीत. ताट जसेच्या तसेच घेऊन यावे लागे. नंतर श्री. बाबासाहेब खापरे आले व त्यांच्याबरोबर मी जातो, म्हणून चि.रामा रडू लागला.**

**मी त्याला म्हटले की श्रीमहाराजांना विचार. त्यावर तो म्हणाला- श्रीमहाराज आहेत कोठे? ते तर भैय्यासाहेबाबरोबर त्यांच्या मोटारीत बसून गेले. तेथे ते नैवेद्य दाखवितात व ते जेवतात. येथे कोठे जेवीत आहेत! तेव्हा मला, नैवेद्य जसाचा तसा कां राहतो, ते समजले.**

**यावरून मला असे वाटत आहे की, महाराजांचे मन आपण आपल्याकडे ओढीत आहा!**

**फार उत्तम! जितके तुम्ही त्यांच्याकरिता रडाल, तितका भाग्याचा दिवस जवळ येईल. मीहि तिकडे येण्याच्या विचारात**

आहे. ता.१९.११.५४ रोजी किंवा जुळल्यास त्या तारखेच्या आतही नागपूरला येण्याचा संभव आहे. कळावे. –ना. पंडित.

०००

पत्र ९ वे.

अमरावती ६–११–५६

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

चि. भैय्या यास अनेक आशीर्वाद. मी अमरावतीस जाण्याचे ठरविल्यापासून तूं सारखा शोक करीत आहेस व गाडीत बसल्यानंतर तुला फारच गहिंवरून आले. पण असे शोक करण्याचे कांही कारण नाही. मी पुन लौकरच परत येणार आहे. असे वाईट वाटू देऊन व सारखा सचिंत उदास राहून, घरच्या माणसांना काळजीत टाकूं नकोस.

तुझे कॉलेजमधे जाणे व्हावे म्हणूनच मी यंदा नागपूरला चार महिने राहिलो, हे तुला माहीत आहे. पण संस्थानचे कामामुळें सतत एके ठिकाणी राहणे शक्य नाही. अशा शोकाकुल अंतःकरणाने शरीरावर परिणाम व्हावयाचा! तसे होऊ देऊ नकोस. मी काही तसा फार दूर नाही.

प्रसन्न अंतःकरणाने राहून अभ्यास कर. मी तेथे नसण्याच्या अवधीत तुला आतापर्यंत झालेल्या अभ्यासाची उजळणी करून घेता येईल व पुढे सोपे जाईल. असो. काही काळजी करू नकोस. आनंदाने राहा. मी कांहीं फार दिवस राहण्याकरिता येथे आलो नाही. कळावे, हा आशीर्वाद. –ना.पंडित.

०००

पत्र १०.

अमरावती २९–१–१९५७

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

चि. भैय्यासाहेब घटाटे यास अनेक आशीर्वाद. आपले पत्र पावले. वाचून आनंद वाटला. आपण पाठविलेल्या चिजा पावल्या. आमच्याकडील बेबी वगैरेंचा समाचार ऐकून बरे वाटले. चि. भैय्या आंदनकराचे पत्र आले.

आपण तेथे येथली आठवण विसरून, आनंदात असता– हे वाचून फार समाधान वाटले. असेच वाटत गेल्यास आपल्या आईबाबांना फार चांगले वाटेल व ते माझा गौरव करतील. हा कांही माझा थोडथोडका लाभ नाही.

अम्मा काशीला गेल्यावर आपले सोवळ्या–ओवळ्याचे कसे काय जमणार ! ही थोडी चिंता वाटते. परीक्षा जवळ येत आहे. अभ्यास चांगला करावा. सहजासहजी पास व्हावयाला पाहिजे.

... इकडे विसर पडला तरी आपण घर सोडून परमार्थात पडणार होतो पण नारायण पैकाजी पंडितांनी मला पुनः संसारात बसविले. –एवढी तरी कृतज्ञताबुद्धि असूं द्यावी.

मी सध्या रत्नागिरीकडे निघालेल्या संजीवनी चिकित्सालयाचे औषध घेत आहे. सिताबर्डी वरील डॉ.गोगटे हे औषध देतात. ते परवा येथे येऊन गेले.– त्यांनी ज्याचा प्रत्यक्ष मधुमेह रोग बसविला ते गृहस्थहि त्यांचे बरोबर होते. पहावे काय गुण येतो तो. त्या साक्षीदार गृहस्थानी तर फार प्रशंसा केली होती. तिकडे करमते, तेव्हा तेथे राहणे आहे तोपर्यंत चि.बेबी, चि.नलू वगैरेकडील हकीकत कळवीत असावे. सर्वांना आशीर्वाद. कळावे. –ना.पंडित.

०००

पत्र ११.

अमरावती गुरुवार ७.२.१९५७

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

चि. भैय्या घटाटे यास अनेक आशीर्वाद. तुझे पत्र पावले. आनंद वाटला. तुझ्या पत्राप्रमाणे येत्या शनिवारी येथे येण्याचे ठरले असल्यास येताना अमृतानुभवकौमुदीची ५० पुस्तके बरोबर घेऊन यावे. श्री निळकंठराव घुईंना सांगावे. त्यापेक्षा जास्त प्रती आणल्या तरी हरकत नाही. पण जरूर आणाव्या. आता येथे एकहि प्रत शिल्लक नाही. आपले येणे होणे नसल्यास निकंठरावला पुस्तके कोणाबरोबर पाठविण्यास सांगावे. कळावे. –ना.पंडित.

०००

पत्र १२ वे.

अमरावती २६–३–१९५७

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

अनेक आशीर्वाद. आपले पत्र पावले. आपले पत्र आले तेव्हा मी येथे नव्हतो. आपले लेक्चर्स पूर्ण भरून काढण्याकरिता आपण आता येथे येऊ नये. मीच ता. ३.४.१९५७ रोज शुक्रवारी तेथे येणार आहे.कळावे. प्रोफेसरने म्हटल्याप्रमाणे जाण्यापर्यंत लेक्चर्स भरून टाकावे.

– ना. पंडित.

००००००००००००

पत्र १३ वे.

अमरावती १३.१०.१९५७

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

चि. भैय्यास अनेक आशीर्वाद. मी येथे येते वेळी फार रडलास, हे बरे नाही. मी आल्यामुळे तुला बरे वाटत नाही, हे साहजिक आहे. असे उदासीनतेत दिवस घालवून काय उपयोग? अभ्यास कसा होईल व परिक्षेचे तरी कसे होईल? या वर्षी मी खरोखर तुझ्याकरितां म्हणूनच नागपूरला राहिलो.

थोडे दिवसांकरिता मला येथे येणे भाग पडले. धीर धरून व आनंदाने राहून अभ्यासाकडे लक्ष दिले पाहिजे. एकदा परीक्षा झाली की मग हरकत नाही.

तूं असाच रडत राहून उदासीन राहिलास तर मला तरी बरे वाटेल कां? घरच्या माणसांनाहि तुला तसे उदासीन पाहून बरें वाटणार नाही. माझ्या येण्यामुळे बरें वाटत नसले तरी तें मनातच ठेवून बाहेर आनंदाने वागले पाहिजे. नाहीतर प्रकृतीवर त्याचा परिणाम व्हावयाचा. माझे तरी एके ठिकाणी राहणे कसे शक्य आहे? याचा विचार कर.

:::तुझ्या घरी श्रीमहाराज आहेत.:::

त्यांचेकडे पाहून समाधान मानीत जा व आनंदाने अभ्यास कर.::: तुझे समाधानाचे होकारार्थी पत्र आल्याखेरीज मला बरें वाटणार नाही. प्रकृतीवर परिणाम होऊ देऊ नकोस. तुला सांगितल्याप्रमाणे तुझ्यापाशी असलेली मालिनीची १/४ गुंज मात्रा दुधातून रोज घेत जा म्हणजे सर्दी आंव होणार नाही. मला व आईबाबांना सचिंत करू नकोस. कळावे. हा अशीर्वाद! –ना. पंडित

ता. क. वरचेवर पत्र टाकून प्रकृति व अभ्यास कळवित जा.

०००

पत्र १४ वे

अमरावती १३.३.१९५८

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

चि. भैय्यास अनेक आशीर्वाद. तुझे पत्र पावले.

ज्यांच्यापाशी जुन्या ज्ञानविचारांच्या पायावर ज्ञानाची इमारत उभारली नसते, अशा पुरुषांच्या बिनापायाची इमारत आपल्या विचाराने ढासळून

पडली तर ते कोणत्या ज्ञानमंदिरात राहतील? या शहाण्यांना प्रमाणांचे प्रमाण्य कोठे लागू असते हे समजत नाही व शहाणपणाच्या अभिमानाने मात्र बेहोष झालेले असतातः मी खेड्यावर गेलो होतो. बगिचा पहायला गेलो व परत येताना एक गाय मागून आली व तिने ताईला मागून धक्का दिला. ती पडली. आधीच - - ने बेजार झाली होती. आणखी हे निमित्य झाले. थोडे हातपाय लचकल्यासारखे झाले. उपाय चालू आहेत. माझी प्रकृति ठीक आहे. परीक्षा आली आहे. तिकडे लक्ष असू दे व आपल्या प्रकृतीकडेही लक्ष दे. पेपर पाहिल्याबरोबर घाबरून जाऊ नको. पेपर नीट वाचावा. मग लिहायला सुरुवात करावी. कळावे, हा आशीर्वाद.

-ना. पंडित.

पत्र १५

अमरावती २७.७.१९५८

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

चि. भैय्यास अनेक आशीर्वाद. तुझे पत्र पावले. मजकूर समजला. प्रवेश मिळाला हे वाचून आनंद वाटला. तूं जे ॲडमिशनचे असे . केले आहे, ते पाहून तर मला हंसूच आले. बीए पास झालेला मुलगा असे स्पेलिंग कसे करितो, याचे अश्चर्य वाटले ज्या इंग्रजी शब्दाचे शेजारी शन् उच्चार असतो त्या शब्दाचे स्पेलिंग- टी आय ओ एन. . असे असते, असा नियम नाही. एज्युकेशन चे तसे स्पेलिंग असले तरी परमिशन चे तसे स्पेलिंग नाही. तुझे असे पत्र कोणी वाचले तर आश्चर्य व्यक्त करतील. आता तूं एम्ए मध्ये गेला. इतःपर अशा चुक्या न होण्याची खबरदारी घेतली पाहिजे. नाहीतर आय्एएस् सारख्या परिक्षेत कित्येक मुले जी काही उत्तरे देतात व जे काही परिक्षेत स्पेलिंग करितात, त्यांचे गमतिदार मासले वर्तमानपत्रातून देतात, तसाच हा तुझा प्रकार परिक्षेतून दिसून आल्यास होणार आहे बाकी सर्व उत्तम. हा अशीर्वाद. आई व बाबांना नमस्कार सांगावा.

- ना.पंडित.

०००

पत्र १६ वे.

अमरावती ०७.११.१९६३.

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

चि. भैय्यास अनेक आशीर्वाद. तुझे पत्र पावले.भक्तिपदतीर्थामृत भाषांतर ग्रंथास तूं लिहिलेली प्रस्तावना तरुणभारतातून वाचण्यात आली. प्रस्तावना लिहिताना ग्रंथातील मूळ विषयाचा ऊहापोह नसावा.ही तुझी प्रस्तावना नव्हे परीक्षण आहे.ग्रंथ ज्ञानानंतर ज्या भक्तीची आवश्यकता प्रतिपादन करण्याकरिता लिहिला आहे, ती आवश्यकता कशी असते, ज्ञानाने मनुष्य कोठपर्यंत पोहोचतो, असे वरवर, ग्रंथाला प्रस्तावना लिहिताना, सु-संबद्ध लिहिले गेले पाहिजे. या तुझ्या प्रस्तावनेत सर्वच येऊन गेले आहे. त्यात लिंक नाही. व ती फार मोठी झाली आहे. रा.निळकंठराव घुईंना विचारून प्रस्तावना लिही. ही प्रस्तावना असंबद्ध झाली आहे. व ती प्रस्तावना लिहिणाऱ्याविषयी अनादर उत्पन्न करणारी आहे. कळावे. हा आशीर्वाद. -ना.पै. पंडित.

०००

पत्र १७ वे.

सौ.लक्ष्मीस पत्र-१

अमरावती दि. १६.४.१९६३.

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

सौ. लक्ष्मीआईस अनेक आशीर्वाद. तुझे संपूर्ण हकीगतीचे पत्र वाचून मला फार आनंद झाला. चि.भैय्याने तुझा रक्तदाब १३५% असे सांगितले होते म्हणून मला फार काळजी वाटत होती. पण

आता माझी प्रकृति बरी आहे हे तुझ्या पत्रात वाचून समाधान वाटले. चि. बाळाचे वजन पुनः वाढत आहे हे वाचूनही फार समाधान वाटले. त्याचे वजन वाढून तो एकदाचांगला बाळसला झाला म्हणजे–

श्रीज्ञानेश्वरमहाराजांपुढे त्याची मी पेढ्याची तुला करणार आहे.

चि. बाळ चांगला बाळसेपर्यंत बहुतेक तुझे इकडे येणे होणार नाही. आणि आणखी दोनतीन महिनेपर्यंत इकडे उन्हाळा फारच पडत असल्यामुळे, तसे करणे बरे होईल असे वाटते. आपल्या प्रकृतीला मात्र जपत जा. चि. भैय्या पांच सहा दिवस येथेच होता. तो मागील रविवारी म्हणजे परवा नागपूरला गेला. तूं दवाखान्यातून मुलाला पाहून आल्यानंतर त्याचे वजन वाढले, हे कळून अल्याबरोबर, मला तूं ती आनंदाची वार्ता, पत्रद्वारे कळवीत जा. ती.स्व. सो.मातुश्री माईसाहेब व भाऊसाहेब यांना माझा सा.नमस्कार कळवावा. कळावे हा अशीर्वाद. –ना.पै. पंडित.

०००

पत्र १८ वे

सौ.लक्ष्मीस पत्र–२

अमरावती ६/५/६३

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

सौ. मातृश्री लक्ष्मीबाईस अनेक आशीर्वाद. तुझे ता. २९/४/६३ चे पत्र मिळाले. चि.बाळाचे वजन वाढत आहे हे वाचून समाधान वाटले. असेंच वारंवार तुझ्या व बाळाच्या तब्येतीविषयीं वारंवार कळवित असावे म्हणजे काळजी वाटणार नाही. बाळ आणखी किती दिवस दवाखन्यात राहणार आहे ते कळवावे.

माझी तब्येत मागे पत्रांत जशी आहे म्हणून लिहिले तशीच आहे. या पंधरवाड्यांत विशेष अशी सुधारणा नाही.

येथे उश्नहाळा दोन दिवसापासून जरा वाढला आहे. प्रवासाचा त्रास सहन होणार नाही म्हणून येथेच उश्नहाळा काढावयाचा विचार आहे. बाकी सर्व ठीक आहे. चि.भैय्या ता. ११/५/१९६३ ला येणार आहे. असे चि. मनोहर इंदापवार नागपूरला गेला होता त्याचेकडून कळले. कळावे हा आशीर्वाद.

रा. रा. भाऊसाहेब व सौ. मातुश्री माईसाहेब यांचे चरणी साष्टांग नमस्कार.

श्रीमहाराजांचे आज्ञेवरून

–निळकंठ माधव घुई.

०००

पत्र १९

अमरावती ता. २१/१/१९६४

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

श्रीमंत रा.रा. बाबासाहेब यांस सप्रेम नमस्कार.

आपले ता. २०/१/१९६४ चे पत्र मिळाले. मजकूर समजला.

चि. भैय्याच्या मुलाचे बारसे ता. २६/१/१९६४ ला ठरले आहे हे वाचून आनंद वाटला. पण मी त्या प्रसंगास हाजर राहू शकत नाही याबद्दल अत्यंत वाईट वाटते.

मी थोडा जरी बरा असतो तर या प्रसंगास अवश्य आलो असतो. सध्या मला बसता सुद्धा येत नाही इतका अशक्तपणा आला आहे. अन्नहि पोटांत जात नाही. पोट नेहमी भरल्यासारखेच वाटते. असो. चि. सौ. लक्ष्मीबाई व लहान मुलाला माझा पूर्ण आशीर्वाद. परमेश्वर त्यांना चिरायु, सुखी व समृद्धिमान करो !

–ना. पै. पंडित.